बुधवार, २८ फेब्रुवारी २०२४

⊙ किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

⊙ मराठी ⊙ दैनिक

⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - १८८

⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) WEDNESDAY 28 FEBRUARY 2024 | adhunikkesari.com | ●YEAR-03 ●ISSUE-188 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05


## ६ लाख ५२२ कोटींच्या तरतूदीचा अंतरिम अर्थसंकल्प सादर

### जीवनमान उंचावण्याकरिता विकास योजनांवर भर

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : राज्याच्या २०२४ - २५ वर्षाच्या एकूण खर्चासाठी ६ लाख ५२२ कोटी रुपयांची तरतूद असलेला अंतरिम अर्थसंकल्प उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी मंगळवारी विधानसभेत सादर केला.**



अर्थसंकल्पामध्ये ४ लाख ९८ हजार ७५८ कोटी रुपये महसुली जमा आणि ५ लाख ८ हजार ४९२ कोटी रुपये महसुली खर्च दाखवण्यात आला आहे. महसुली तूट ९ हजार ७३४ कोटी रुपयांची तर, राजकोषीय तूट ९९ हजार २८८ कोटी रुपयांची अंदाजित करण्यात आली आहे. या अर्थसंकल्पात चार महिन्यांचे लेखानुदान मंजुरीसाठी ठेवण्यात आले आहे. उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत सादर केलेल्या अंतरिम अर्थसंकल्पात कार्यक्रम खर्चाकरिता नियोजन विभागास ९ हजार १९३ कोटी रुपये, रोजगार हमी योजनेसाठी २ हजार २०५ कोटी रुपये, मराठी विभागासाठी ७१ कोटी रुपये नियतव्यय मंजूर करण्यात आला आहे. जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत १८ हजार १६५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. राज्याची वार्षिक योजना १ लाख ९२ हजार कोटी रुपयांची आहे. अनुसूचित जाती उपयोजनेसाठी १५ हजार ८९३ कोटी रुपये, आदिवासी विकास उपयोजनेसाठी १५ हजार ३६० कोटी रुपये प्रस्तावित करण्यात आले आहेत.
राज्याचा हा अंतरिम अर्थसंकल्प असला तरी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी, शेतकरी, कष्टकरी, महिला, विद्यार्थी, युवक, मागासवर्गीय, आदिवासी, अल्पसंख्याक, उद्योजक, व्यापारी, व्यावसायिक अशा समाजातील सर्व घटकांना न्याय आणि विकासाची संधी उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न अर्थसंकल्पात केला आहे. अंतरिम अर्थसंकल्पातही अर्थमंत्री अजित पवार यांनी शाश्वत, पर्यावरणपूरक, सर्वसमावेशक विकास साधण्याच्या राज्याच्या धोरणाला गती देण्यास प्राधान्य दिले आहे. राज्याची अर्थव्यवस्था एक ट्रिलीयन डॉलर करण्यासाठी महाराष्ट्र आर्थिक सल्लागार परिषदेने दिलेल्या दिशादर्शक अहवालानुसार आवश्यक धोरणांची अंमलबजावणीही अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.
पायाभूत सुविधांकरिता मोठ्या प्रमाणात भांडवली गुंतवणूक, नागरिकांचे जीवनमान उंचावण्याकरिता विकास योजनांच्या अंमलबजावणीचे ध्येय साध्य करण्याचा प्रयत्न अर्थमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्पातून केला आहे.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी आज यवतमाळात

आधुनिक केसरी न्यूज




यवतमाळ : पंतप्रधान नरेंद्र मोदी बुधवारी यवतमाळ-नागपूर मार्गावरील भारी येथे आयोजित महिला बचत गटाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात मोदी हे दीड लाखांहून अधिक बचत गटांच्या महिलांना संबोधीत करणार आहेत. भारी परिसरात या मेळाव्याची जय्यत तयारी केली आहे. सभास्थळी 45 एकराच्या विस्तीर्ण जागेवरती सभामंडप उभारण्यात आले आहे.
या सभेच्या अनुषंगाने सकाळी 7 वाजेपासून तर रात्री उशिरापर्यंत 500 च्यावर मजूर महिलांना बसण्यासाठी डोम (सभामंडप) उभारण्यात आले आहे. पंतप्रधान मोदी हे चौथ्यांदा यवतमाळ जिल्हाच्या दौऱ्यावर येत आहेत. 2004 मध्ये गुजरातचे मुख्यमंत्री असताना ते यवतमाळला आले होते. त्यांची जाहीर सभा पोस्टल ग्राउंडवर झाली होती. यानंतर 20 मार्च 2014 ला लोकसभा निवडणुकीपूर्वी आर्णीजवळ असलेल्या दाभडी येथे भाजपचे पंतप्रधानपदाचे उमेदवार म्हणून आले होते. त्यावेळी त्यांनी 'चाय पे चर्चा'तून देशभरातील शेतकऱ्यांशी संवाद साधला होता. यानंतर लोकसभा निवडणुकीपूर्वी 16 फेब्रुवारी 2019 रोजी यवतमाळच्या पांढरकवडा येथे महिला बचत गटाच्या मेळाव्याला मार्गदर्शन करण्यासाठी देखील ते आले होते. आता पुन्हा पंतप्रधान मोदी हे यवतमाळ येथे येत असल्याने महाराष्ट्र आणि यवतमाळ येथे येण्याची ही पंतप्रधानांची चौथी वेळ आहे.











विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932




आधुनिक केसरी

परवाच्या दिवशी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनी मार्सेलिसच्या बंदरात मारलेल्या ऐतिहासिक उडीला ११० वर्षे पूर्ण झाली. मृत्यूलाही न घाबरणाऱ्या या मृत्युंजयाने या प्रसंगी उत्स्फूर्तपणे जी कविता म्हटली, ती अक्षरशः त्यांच्या जीवनाला लागू पडते. अनादी मी अनंत मी, अवध्य मी भला मारील रिपु जगती असा कवण जन्मला !! सावरकर यांच्या जीवनावर या निमित्ताने अनेक लेख सोशल मीडियावर आले. काही लेखातून त्यांच्या या उडीसंबंधीच्या धाडसाचे वर्णन केले गेले. काही लेखात त्यांच्या कार्याचे वर्णन आले होते. पण तरीही त्यांच्याबद्दल काहीतरी लिहावे असे मला वाटले. या संदर्भात मी विचार करत असताना असे जाणवले की आपण तात्याराव सावरकरांना स्वातंत्र्यवीर म्हणून संबोधतो आणि ते योग्यच आहे. पण सगळेच्या सगळे सावरकर कुटुंब देशासाठीच्या स्वातंत्र्य यज्ञात सहभागी झालेले होते. त्या यज्ञकुंडात प्रत्येकाच्या समिधा पडल्या आहेत. बाबरांवाचा त्याग आणि त्यांचं कार्य स्वातंत्र्यवीरांपेक्षा यत्किंचितही कमी नाही. बाबारावांच्या पत्नी म्हणजे सावरकरांच्या वहिनी येसूबाई या माऊलीचा त्याग तर फार मोठा आहे. आपल्याला सावरकरांबद्दल माहिती असते पण येसूबाई कोण, त्यांचं कार्य काय आणि देशासाठी केवढा त्याग या माउलीने केला, याची जाणीव कदाचित फार थोड्या लोकांना असेल. म्हणून या लेखाच्या भाग दोन मध्ये त्यांच्या कार्याची थोडी दखल घेण्याचा प्रयत्न मी माझ्या परीने करणार आहे. आज फक्त एवढंच म्हणतो की ' तेथे कर माझे जुळती. ' सावरकर म्हणजे तेज. सावरकर म्हणजे लखलखती ज्वाला. स्वातंत्र्यासाठी पेटलेले धगधगते अग्नीकुंडही तेच आणि त्या यज्ञातील समिधा किंवा आहुतीही तेच. या देशभक्ताने आपले अवघे जीवन, अवघे तारुण्य देशासाठी अर्पण केले. स्वातंत्र्य मिळून आज सत्तरच्या वर वर्षे झाली, पण अजूनही आम्ही या भारतमातेच्या सुपुत्राला समजून घेण्यात आणि त्याच्या कार्याला पुरेसा न्याय देण्यात कमी पडतो आहोत असे मला वाटते. कारण अजूनही सावरकर वादाचा विषय ठरतात. सावरकर नायक की खलनायक असा चर्चेचा विषय मागे एका टीव्ही वाहिनीने ठेवला होता.

मागे पुण्यातले प्रख्यात समाजवादी नेते एस एम जोशी सावरकरांबद्दल बोलताना म्हणाले होते की १९२१ पूर्वीचे सावरकर आम्हाला मान्य आहेत. त्यानंतरचे सावरकर आम्हाला मान्य नाहीत म्हणजेच सावरकर क्रांतिकारक म्हणून आम्हाला मान्य आहेत. पण स्वातंत्र्यानंतरही त्यांनी जे सामाजिक कार्य केले, त्यांची जी आधुनिक आणि विज्ञाननिष्ठ दृष्टी होती ती आम्हांला मान्य नाही.



## आनंदी पहाट

# आपल्या नशिबातील योग हे योग्यच ठरतात

आधुनिक केसरी

आपल्या आयुष्यातील गेलेल्या क्षणांना आपण कितीही ठरवले तरीही विसरू शकत नाही. त्या गतकाळातील आठवणीचा प्रत्येक क्षण आपल्याला काहीवेळा नवी उभारी देत असतो, तर काहीवेळा नैराश्यात देखील घेऊन जात असतो. भूतकाळात घडलेल्या प्रत्येक घटनेचा, घडामोडीचा संबंध आपण आपल्या वर्तमानातील जीवनाशी जोडण्याचा केविलवाणा प्रयत्न नेहमीच करत असतो. जो गेला तो भूतकाळ होता, त्यांत किती गुरफटून राहायचे, ह्याचे कित्येकवेळा आपल्याला भानच रहात नाही. तो काळ आपण कितीही ठरवला, तरीही विसरूच शकत नाही. खरे म्हणजे भूतकाळात रममाण होण्यापेक्षा वर्तमानातील परिस्थिनुसार भविष्य उज्वल करण्याचा आपण प्रामुख्याने आणि प्राधान्याने विचार केला पाहिजे. आपण अनेकदा भूतकाळातून अंतर्मनाने बाहेर पडत नाही आणि वर्तमानातील आनंद मिळवू शकत नाही, केवळ आपल्या नशिबाला आणि भविष्याला दोष देत बसतो. खरे म्हणजे, नशिबाच्या खेळामुळे नाराज होऊ नये. जीवनांत काहीही झालं तरी उदास होऊ नये. हातांवरच्या रेषांवर कधी भविष्य पाहू नये आणि विश्वासही ठेवू नये. कारण, भविष्य तर त्यांना देखील असते, ज्यांना हातच नसतात. आपल्या नशिबातले योग आपणच आणायचे असतात. त्यासाठी हातापेक्षा सकारात्मक विचार आवश्यक असतात. आपले विचार बदलेले तर नशीब बदलतेच.

असं म्हंटले जाते, कि प्रारब्धातील भोग आणि नशिबातील योग कधीही चुकवता येत नसतात. परंतू ह्या दोन्हींचा संबंध आपल्या विचार, वर्तन आणि व्यवहारांशी निगडीत असतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655




आधुनिक केसरी

## चैतन्य स्वरूपे | विठुमय ||

पंढरीची वारी | आनंद सोहळा ||
विठ्ठल सावळा | आम्हा संगे ||१||
संताचे पाईक | झालो समाधानी ||
काया वाचा मनी | सुखावलो ||२||
सुख दुःख आम्हा | नाही देणे घेणे ||
स्थितप्रज्ञ जीणे | अभंग हे ||३||
आम्ही भाग्यवंत | दास विठ्ठलाचे ||
भोग प्रारब्धाचे | शुन्य झाले ||४||
संसार सुखाचा | झाला हरि कृपे ||
चैतन्य स्वरूपे | विठुमय ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८



हि
त
गु
ज



गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे,
दिंडोरी (नाशिक)

## आत्मकल्याणाची वाट


गुरु दत्तात्रय महाराजांनी विनम्रतेचा आदर्श घालून दिला आहे.श्री दत्त महाराज गायत्री तेजाचे क्रियात्मक स्फुरण आहेत. धर्माचा उत्कर्ष करण्यासाठी श्री दत्त महाराज व त्यांच्या अवतारांनी आपला प्रत्येक क्षण व्यतित केला आहे.त्यांनी धार्मिक समन्वय ही उत्तम प्रकारे घडवला आहे. श्री दत्त महाराजांनी मलंग, फकीराचा वेष घेऊन तत्कालीन मुस्लिम समाजालाही ज्ञानाचा उपदेश देऊन उद्धाराचा मार्ग दाखवला आहे. श्री श्रीपाद श्रीवल्लभ, श्री नृसिंह सरस्वती, श्री स्वामी समर्थ महाराजांनीही वेगवेगळ्या धर्मांच्या जनसाधारणास मार्गदर्शन करून आत्मकल्याणाची वाट सोपी करून दिली. श्री स्वामी चरित्र सारामृतानुसार महाराज श्री स्वामी समर्थ अक्कलकोटला आल्यावर प्रथम मुस्लिम सेवकांची भ्रांती चमत्काराद्वारे नष्ट करून चोळप्पाकडे त्यांचे बरोबर भोजन करतात. यावरून यवन,पारशी, हिंदू तीनही शिष्य समभावाने महाराजांची सेवा करून आनंद प्राप्त करीत असत हे स्पष्ट होते.श्री दत्तात्रेयांचा अवतार असलेल्या श्री स्वामी समर्थ महाराजांनी होती पंडित्याची निष्फळता दर्शवून विष्णुबुवा ब्रह्मचाऱ्याचा दंभ नष्ट केला. अहंकाराचे निर्मूलन हा स्वामी सेवेचा पहिला पाठ आहे. "करता करविता तूच एक स्वामी नाथा,माझ्या ठाई मीपणाची वार्ता नसेची" हा भाव दृढ झाल्याशिवाय समर्पण अंगोपांगी, भाव बुद्धीत रुजविल्याशिवाय स्वामींची कृपा मिळत नाही. बाळाप्पांनी गाणगापूरी सेवा केल्यानंतर श्री दत्त महाराजांनी त्यांना आदेश दिला की मी अक्कलकोटी राहतो आहे तरी वरित तेथे जावे. बाळाप्पा अक्कलकोटी आल्यानंतर श्री स्वामी समर्थ महाराजांनी लिलेने त्यांना मीच कुलस्वामिनी,मीच सर्व देवता असल्याची एकनिष्ठ ज्ञानानुभूती प्राप्त करून दिली.

संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक
संपर्क क्र. ९९२२४२००३४

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

चक्र ब्रह्म रन्ध्राख्य है,
सहसरार तत्त्व ज्ञान ।
गूढ़ तत्त्व गम योग है, चक्र भेद विज्ञान
।।२९।।(स्वर्वेद तृतीय मण्डल द्वितीय
अध्याय) ०३/०२/२९

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
वरच्या दोह्यात सहा चक्रांचे वर्णन आहे आणि या दोह्यात ब्रह्मरंध्राख्य आणि सहस्त्रार या उर्वरित दोन चक्रांचे वर्णन आहे. या चक्रांच्या गूढ भेदाचे ज्ञान योगाद्वारे प्रत्यक्ष होते.




स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# नामाचे प्रेम का येत नाही ?

आधुनिक केसरी

आज इतकी वर्षे होऊन गेली तरीसुद्धा ज्ञानेश्वर, तुकाराम, समर्थ रामदास यांच्यासारख्या थोर संतांचे नाव टिकून राहिले आहे. याचे खरे कारण हे की, त्यांचे नामावर अत्यंत प्रेम होते. या सर्व संतांच्या वचनांवर आपण विश्वास ठेवतो. त्यांच्याप्रमाणे नामाचे प्रेम आपल्यालाही यावे असे आपल्याला वाटते. पण ते प्रेम आम्हाला का उत्पन्न होत नाही, याचा विचार आपण करायला पाहिजे. त्या नामाला उपमा देताना, ते अमृतापेक्षाही गोड आहे असे त्यांनी सांगितले. नामाला अमृताची उपमा देताना, त्या अमृताच्या पलीकडे दुसरी गोष्टच नाही असे आपण म्हणतो. मग त्या नामाचे प्रेम आम्हाला का बरे नसावे ? तर त्या नामाच्या आड काही तरी येत असले पाहिजे हे खास. ज्याप्रमाणे आपण तोंडात साखर घातल्यावर आम्हाला जर ती गोड लागली नाही, तर तो दोष साखरेचा नसून आमच्याच तोंडाला चव नाही असे आपण म्हणतो, त्याप्रमाणे नामाची गोडी आमच्या अनुभवाला येत नसेल, तर आमच्यामध्येच काही तरी दोष असला पाहिजे खास. नामाचे प्रेम येण्याला



बहुतेक लोक काही ना काही अडचणी सांगतात. कुणाला विचारले, “नामाचे प्रेम का येत नाही ?” तर तो सांगतो, “माझे लग्न झाले नाही. ते होऊन प्रपंच, मुलेबाळे हे सर्व झाल्यावर मला नामाचे प्रेम येईल.” पण लग्न करून मुलेबाळे असलेल्या किती लोकांना नामाचे प्रेम लागले आहे ? कोणी म्हणतो, “पैसा नाही म्हणून प्रपंचाची काळजी वाटते आणि नामाचे प्रेम येत नाही.” परंतु अगदी भरपूर पैसा असलेल्या किती लक्षाधीशांनी नामाचे प्रेम मिळविले आहे ? कोणी म्हणतो, “या प्रपंचात बायकोमुले, आजारपण, शेतीवाडी यांच्या व्यापामुळे आम्हांला नामाचे प्रेम लागत नाही;” तर कोणी म्हणतो, “प्रपंचात राहून मला आता कंटाळा आला आहे; मी आता संन्यास घेतो, म्हणजे मला नामाचे प्रेम येईल;” तर कोणी प्रापंचिक दुःखाला कंटाळून अगदी आत्महत्या करायला निघतो. अशा रीतीने, सर्वजण ज्या परिस्थितीत असतात त्या परिस्थितीत नामस्मरणाला अडचणच सांगत असतात. नामाचे प्रेम न यायला खरोखरच परिस्थिती कारणीभूत आहे का, याचा विचार आपण करायला पाहिजे. मला वाटते, नामाचे प्रेम न यायला खरोखर कारण कोणते असेल, तर भगवंत हवा असे आम्हाला मनापासून वाटतच नाही. भगवंत हवा आहे असे वाटणे, हे खरोखर भाग्याचे लक्षण आहे. तुम्हाला खरोखरच भगवंत हवा आहे असे वाटू लागले म्हणजे त्या हवेपणातच त्याच्या प्राप्तीचा मार्ग दिसू लागेल.

**५८. नामाची गोडी अशी विलक्षण आहे की, ज्याला ती लागली त्याला स्वतःचे भान राहात नाही. म्हणून नामाला वाहून घ्यावे.**

## गुणरूपनिरसन

आधुनिक केसरी

विश्वांत सगळीकडे व्यापून असणारी जाणिवेची संवेदना अनुभवास येईल असे मन तयार करणे हाच परमार्थ साधनेचा प्राण आहे. ज्ञानी पुरूष सांगतात की हे संपूर्ण विश्व नाम रूपानी भरलेले आहे.प्रत्येक वस्तूला नाम व रूप अशी दोन अंगे असतात. रूप म्हणजे वस्तूंचे बहिरंग ते पंचमहाभूतांचे बनलेले आहे व ते स्थूल आहे. नाम म्हणजे वस्तूंचे अंतरंग ते जाणीवमय व सुक्ष्म असुन शक्तिमान असे आहे.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

बुधवार, २८ फेब्रुवारी २०२४

# यवतमाळमधून वाजणार लोकसभेचा बिगुल

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा झंझावाती दौरा

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर आज पुन्हा एकदा यवतमाळला येत आहेत. यवतमाळ नागपूर महामार्गावर असलेल्या भारी या गावी त्यांची भव्य जाहीर सभा होणार असून बचत गटांच्या दोन लाखाहून अधिक महिलांना देशाचे पंतप्रधान या सभेतून मार्गदर्शन करणार आहेत.

काँग्रेस पक्ष अजूनही आपल्या अंतर्गत गटबाजी, जुन्या जाणत्या नेत्यांचा भाजप प्रवेश या सगळ्यांने त्रस्त असून सक्षम नेतृत्वासाठी चाचपडत असतांना, भाजपा मात्र 2024 ची निवडणूक आक्रमकपणे लढण्याच्या तयारीला लागला आहे. अबकी बार 400 पार चा नारा देत लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर महाराष्ट्राच्या यवतमाळमधून पुन्हा एकदा मातृशक्तीच्या



प्रा. शाम हेडाऊ
9834301568

साक्षीने निवडणुकीचे बिगुल वाजणार आहे. 2019 मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत विदर्भातील लोकसभेच्या 10 जागांपैकी 5 जागा भाजपा , 3 जागा शिवसेना ( शिंदे गट ) , 1 राष्ट्रवादी काँग्रेस तर 1 जागा काँग्रेस च्या वाट्याला आली होती . यातील काँग्रेस च्या वाट्याला आलेली जागा ही भाजपच्या जिव्हारी लागलेली आहे .

चंद्रपूर वणी आर्णी लोकसभा मतदार संघ हा भाजपाचा गड होता . हंसराज अहिर हे या नव्याने पुनर्रचना झालेल्या मतदार संघात निवडून आले होते. काँग्रेस च्या बाळू धानोरकर यांनी 2019 च्या निवडणुकीमध्ये केंदीय गृह राज्यमंत्री असलेल्या हंसराज अहिर यांचा अवघ्या 44000 मतांनी पराभव केला होता. तर यवतमाळ वाशिम हा मतदारसंघ सध्या शिवसेनेच्या ( शिंदे गट ) भावना गवळी यांच्याकडे आहे.

त्यामुळे नरेंद्र मोदी यांच्या या दौऱ्याचा फायदा भाजपा ला होणार की भावना गवळी यांच्या जागी नवीन चेहरा येणार याची चर्चा या दौऱ्याच्या निमित्याने सुरू झाली आहे . नवनीत राणा यांनी काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस च्या पाठिंब्यावर अपक्ष निवडणूक लढवत विजय मिळविला होता. परंतु हनुमान चाळीसा पठण कार्यक्रमापासून त्यांची भाजपाकडे सुरू असलेली वाटचाल आता कुठे पोहोचणार तेही लवकरच कळेल.

एकूणच मोदींची ही सभा चंद्रपूर च्या या जागेसह विदर्भातील इतर जागांना बळ देणारी ठरेल का ? हे येणार काळ सांगेल . पण नरेंद्र मोदी यांच्या या जाहीर सभेने लोकसभेच्या निवडणूकीचे बिगुल वाजणार हे मात्र निश्चित.

या सभेच्या निमित्याने येणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे वर्धा यवतमाळ नांदेड या बहुप्रतिक्षित रेल्वेमार्गाचा शुभारंभ करणार आहेत . या रेल्वेमार्गामुळे या भागतील नागरिकांची रेल्वे प्रवासाची मोठी समस्या दूर होणार आहे. याच श्रेय निश्चितच भाजपा ला मिळेल .

शिवाय बंजारा समाजाची काशी म्हणून ओळख असलेला वाशिम मधील पोहरा हा भाग सुद्धा येथून जवळ असून नरेंद्र मोदी आपल्या सभेत बंजारा समाजालाही हाक देतील का ते पाहणे औत्सुक्याचे ठरेल .

महाराष्ट्राच्या ईशान्य दिशेला असणारा विदर्भ हा नेहमीच राज्यासह देशाच्या राजकारणाला एक वेगळी दिशा देणारा ठरला आहे. महाराष्ट्राची उपराजधानी नागपूर ही विदर्भाची शान आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि दीक्षाभूमी असे दोन प्रमुख वैचारिक केंद्र हे सुद्धा या विदर्भाच्याच भूमीत आहेत. आणि म्हणूनच कदाचित देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे यापूर्वीही चार वेळा विदर्भाच्या दौऱ्यावर येऊन गेले आहेत . देशभर गाजलेला " चाय पे चर्चा " हा कार्यक्रम देखील विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यातील देणं. मोदींच्या या दौऱ्याच्या निमित्याने या चाय पे चर्चा कार्यक्रमाचीही लोकांना आठवण आली आहे. निवडणूकीच्या दृष्टीने पाहू गेल्यास विदर्भात नेहमीच भाजप विरूद्ध काँग्रेस अशीच दुहेरी लढत होत आलेली आहे.

**पंतप्रधान चौथ्यांदा यवतमाळ दौऱ्यावर** : पंतप्रधान मोदी हे चौथ्यांदा यवतमाळ जिल्हाच्या दौऱ्यावर येत आहेत . 2004 मध्ये गुजरातचे मुख्यमंत्री असताना ते यवतमाळला आले होते . त्यांची जाहीर सभा पोस्टल ग्राउंडवर झाली होती . यानंतर 20 मार्च 2014 ला लोकसभा निवडणुकीपूर्वी आर्णीजवळ असलेल्या दाभडी येथे भाजपचे पंतप्रधानपदाचे उमेदवार म्हणून आले होते . त्यावेळी त्यांनी 'चाय पे चर्चा'तून देशभरातील शेतकऱ्यांशी संवाद साधला होता . यानंतर लोकसभा निवडणुकीपूर्वी 16 फेब्रुवारी 2019 रोजी यवतमाळच्या पांढरकवडा येथे महिला बचत गटाच्या मेळाव्याला मार्गदर्शन करण्यासाठी देखील ते आले होते . आता पुन्हा पंतप्रधान मोदी हे यवतमाळ येथे येत असल्याने विदर्भ आणि यवतमाळ येथे येण्याची ही पंतप्रधानांची चौथी वेळ आहे .

विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा गेल्या काही वर्षात सगळ्यात महत्त्वाचा विषय म्हणून समोर आला आहे. या विषयाच्या अनुषंगाने मोदी काही नवीन घोषणा करणार का ? महिला सक्षमीकरणाच्या दृष्टिकोनातून काही नवीन मोठ्या प्रोजेक्ट ची घोषणा होईल का ? विदर्भाला सिंचनाच्या काही नवीन योजना , काही नवीन प्रकल्प मिळणार का ? याची या दौऱ्याच्या निमित्याने चर्चा व्हायला लागली आहे. बचत गटाच्या माध्यमातून उभ्या झालेल्या महिलांच्या चळवळीचा महिलांना मोठा फायदा झाला असून यामुळे त्या आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी झालेल्या पाहायला मिळतात. त्यांच्या सक्षमीकरणासाठी मोदी या दौऱ्यात आणखी काही नवीन घोषणा करणार का ? हाही एक औत्सुक्याचा विषय आहे. लोकसभा निवडणूक आणि त्यापूर्वी मोदींचा विदर्भ दौरा हे एक समीकरण झाले असून या समिकरणातून विदर्भाच्या वाट्याला काय मिळणार याचीच आता प्रतीक्षा सगळ्यांना लागली आहे.



# सबका साथ, सबका विकास, हाच नरेंद्र मोदींचा ध्यास

2014 सालात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाची सूत्र हाती घेतली आणि भारत मातेची सेवा करताना विकास राष्ट्रभक्ती सांस्कृतिक वाद सुरक्षा परराष्ट्र धोरण एवढेच नव्हे तर आपल्या देशाची अस्मिता असलेला प्रश्न अर्थात काश्मीर 370 कलम हटवलं आणि राम मंदिर प्रस्थापित करणे याचाच अर्थ सबका साथ सबका विकास या धाग्यातून पंतप्रधान आणि सर्व स्पर्शी केलेलं काम खऱ्या अर्थाने देशातील 138 कोटीच्या जनतेच्या नजरेस उतरलं म्हणून जगाच्या पाठीवर भारत माता प्रबलशक्ती देश ओळख निर्माण करून ज्या नेतृत्वाने दाखवली त्यांनीच अखेर मंदिर उभारणी केली. धर्मयुगात कंसाचा वध करण्यासाठी श्रीकृष्णाचा जन्म, रामायण काळात रावणाचा वध करण्यासाठी प्रभु रामचंद्राचा जन्म, दुर्योधनाचा वध करण्यासाठी अर्जुनाचा जन्म, हिरण्यकशिपाला मारण्यासाठी नृसिंह अवतार त्याचप्रमाणे आयोध्येत राम मंदिर बांधण्यासाठी साडे चारशे वर्षानंतर पंतप्रधान म्हणुन नरेंद्र मोदीचा जन्म असं म्हटलं तर अतिशयोक्ती वाटणार नाही. 22 जानेवारीला आयोध्येत प्रभु रामचंद्र मुर्तीची प्रतिष्ठापना दिमाखदार सोहळ्याने संपन्न झाला ज्याची तयारी देशाच्या कानाकोपऱ्यात हिंदु बांधव



राम कुलकर्णी
9422742577

करताना दिसत होती . प्रभु रामचंद्र जन्मालाच आले नाहीत इथपासुन केवळ मताच्या लाचारीसाठी ज्या काँग्रेसवाल्यांनी उभ्या आयुष्यात भाजपला शिव्या देताना कलियुगात देखील रामाला वनवासात ठेवले. तिच मंडळी आज श्रेय घेण्यासाठी धडपड करू लागली हे आश्चर्यच म्हणावे. मणिशंकर अय्यरपासून दिग्विजयसिंह यांना तर आयोध्येत पाय ठेवण्याचा मुळात नैतिक अधिकारच नाही ज्यांनी नेहमीच त्या स्थळासह राम नावाची अवहेलनाच केली. मंदिर काम का नही, शौचालय बाँधेंगे अशा घोषणा देखील काँग्रेसवाल्यांनी दिलेल्या लोक विसरले नाहीत. ऊन, पाऊस, वारा अगदी तंबुत ठेवण्याचे पाप यामागे काँग्रेसवाले कमी नाहीत. पण न्यायदेवतेनं अखेर निवाडा दिला. प्रभु रामाचं अस्तित्व मान्य केलं आणि हा सारा उद्योग घडवुन आणण्यासाठी पंतप्रधान म्हणुन नरेंद्र मोदी यांना जन्म घ्यावा लागला. प्रश्न नेहमीच पडतो की समजा मोदी हे पंतप्रधान नसते?तर राम जन्मभुमीचा प्रश्न मार्गी लागला असता का?

देशातील समस्त भारतीयांच्या स्वाभिमानाचा, अस्मितेचा दिवस म्हणावा लागेल. कारण 22 रोजी आयोध्येत प्रभु रामचंद्राची भव्य मुर्ती विधीवत प्राण प्रतिष्ठा होणार. हे मंदिर भारताच्या वैभवशालीचं, श्रद्धा आणि अस्मितेचं प्रतिक अजरामर हे लक्षात घ्यावे लागणार. जो क्षण पहाण्यासाठी देशातील कोट्यावधी हिंदु धर्माच्या सामुहिक लढ्याच्या प्रयत्नाचे यश म्हणावे लागेल. मुघलांनी भारतीय हिंदु समाजातील अस्मिता, श्रद्धा पुसुन टाकण्यासाठी खऱ्या अर्थाने आयोध्येतील राम मंदिर पाडून त्या ठिकाणी बाबरी बांधली होती. ज्याचा लढा साडे चारशे वर्षे अधिक काळ चालला. खरं तर राम कुणाचा? हा प्रश्न अनेकजण जेव्हा विचारतात तेव्हा जगाच्या पाठीवर चराचर जीवासाठी प्रभु रामचंद्र हा बाप म्हणुन ओळखल्या जातो. आयोध्येतील मंदिर कुणी पाडले? बाबरी कुणी बांधली? या खोलात जाण्यापेक्षा जे स्वप्न भारतीयांचं होतं ज्यांच्यासाठी साडे चारशे वर्षे लढा भारतीय जीवाने दिला. तो क्षण समीप आल्याने संपुर्ण देशात आज 22 जानेवारीला दिवाळी साजरी होणार यात शंका नाही. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाचे नेतृत्व वर्षानुवर्षे काँग्रेसवाल्यांनी केलं. खरं तर असा एक दिवस ज्या देशात फक्त काँग्रेस हाच ओळखीचा पक्ष म्हणुन उदयास आला होता. कालांतराने डावे, उजवे नंतर संघ, जनसंघ आणि पुन्हा भारतीय जनता पार्टी पण रामाच्या नावाने राजकारणचं नव्हतं. फक्त मंदिर उद्धवस्त करून बाबरी बांधली ते भारतीयांना खटकलं होतं. ज्या आयोध्येत प्रभु रामचंद्र जन्माला आले तिथे राम मंदिरच असावे यासाठी समस्त हिंदु धर्माने वेगवेगळ्या मार्गाने सामुहिक लढा दिला. विश्व हिंदु परिषद, बजरंग दल, कालांतराने संघ परिवार नंतर भाजप असे हिंदु राष्ट्र भक्तीच्या प्रवाहातले वेगवेगळे आयाम लढ्याचे साक्षीदार म्हणावे लागतील. मागणी योग्य होती. कारण प्रभु रामचंद्र आयोध्येतच जन्माला आले होते. ज्याचे पुरावे मोठ्या प्रमाणावर मिळाले. न्यायदेवतेला देखील पटले. मात्र या देशात जी व्यवस्था होती उदा.काँग्रेसवाले सत्तेवर होते, त्यांनीच हा मंदिर बांधकामाचा प्रश्न केवळ मताच्या लाचारीसाठी लोंबकळत ठेवला असं म्हटलं तर चुकीचं वाटणार नाही. आयोध्येत होणारे शिलान्यास कार्यक्रम असो किंवा कारसेवकांची मोहिम असो या साऱ्या चळवळीला हाणुन पाडण्याचे काम अनेकदा काँग्रेसवाल्यांनी केंद्रात आणि राज्यात सुरू केलं. समाजवादी पुन्हा डावे आणि काँग्रेसवाले या सगळ्यांचं एकत्रित पाप म्हणजे राम मंदिर न होवु देणं असंच म्हणावे लागेल. पण हिंदु किती सहिष्णु आहे आणि एक दिवस अहिंसेच्या मार्गाने न्याय मिळु शकतो ज्या लढ्याला साडे चारशे वर्षे तेव्हा पदरात यश पडलं. नेहमीच काँग्रेसवाल्यांनी राम मंदिर बांधकाम मोहिमेची अवहेलना केलेली आहे.फार जुन्या काळातले नाही तरीही इंदिरा गांधी, राजीव गांधी तदनंतर सत्तेवर असलेल्या काँग्रेसी पंतप्रधानाने मंदिर बांधकामाचा विषय हाताळताना केवळ हिंदु धर्माची अवहेलनाच केली असं नव्हे राम जन्मालाच आले नव्हते यावर प्रश्नचिन्ह निर्माण केले. म्हणुनच राम मंदिर ट्रस्ट आयोध्या आणि सरकार यांच्यातील संघर्ष अनेक वर्षे सुरू राहिला. कदाचित काँग्रेसी व्यवस्थेने राम मंदिराचा प्रश्न चुटकीसरशी मार्गी लावला असता तर आमचा राम कलियुगात वनवासात गेलाच नसता हे मात्र नक्की. सांगायचं तात्पर्य असे अनेक काँग्रेसवाले सत्ता पदावर असताना राम मंदिराची चेष्टा करत असत. पण व्यवस्था त्यांच्या हातात असल्यामुळे हिंदुंची देखील मुस्कटदाबी व्हायची. खरं तर मंदिर बांधकाम हा भारतीयांच्या स्वत्वाचा लढा श्रद्धास्थानाचा पुरातन भारतीय संस्कृती आणि अस्मितेचे प्रतिक मात्र मुघल आक्रमकांनी हेच प्रतिके नष्ट करून टाकली होती. देशात वर्षानुवर्षे काँग्रेसी व्यवस्था अबाधीत राहिल्याने पुरोगामी धर्मनिरपेक्षतेच्या नावाखाली भारतीय संस्कृती आणि इतिहास दाबुन ठेवण्याचे पाप यांनी केलं.


वास्तविक पाहता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मागच्या दहा वर्षात देशाचे नेतृत्व करताना सबका साथ सबका विकास याच धाग्यातून देशातील प्रत्येक नागरिक माझा आहे हा धडा भाव मनात ठेवून कार्य केलं जगाच्या पाठीवर भारत मातेची प्रतिष्ठा उंचावून दाखवली स्वातंत्र्यानंतर यशस्वी पंतप्रधान म्हणून त्यांचं नेतृत्व देशाच्या इतिहासात सुवर्ण अक्षराने लिहावं असंच आहे सर्व स्तरातून मिळणारा आशीर्वाद त्यांच्या नेतृत्व बळकटीसाठी महत्त्वाचा यात शंका नाही आगामी काळात पुन्हा एकदा देशात चारशे पार विजयाची हॅट्रिक केल्याशिवाय हे नेतृत्व राहणार नाही कारण 138 कोटी मतदारांच्या हृदयावर त्या नेतृत्वांना जागा प्राप्त झालेली आहे.

# कमलनाथांचा संताप

आधुनिक केसरी

लोकसभा निवडणूक तोंडावर आलेली असताना भाजपा काँग्रेसला मोठमोठे धक्के देत आहे. काही दिवसांपूर्वी महाराष्ट्रात काँग्रेसला तीन मोठे धक्के बसले आहेत. माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी भाजपात प्रवेश केला आहे. तसेच माजी खासदार मिलिंद देवरा यांनी शिवसेनेच्या शिंदे गटात आणि माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांनी राष्ट्रवादीच्या अजित पवार गटात प्रवेश केला आहे. दरम्यान, आता काँग्रेसचे दिग्गज नेते आणि मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री कमलनाथ आणि त्यांचा मुलगा नकुलनाथ हे भाजपामध्ये प्रवेश करणार असल्याची जोरदार चर्चा आहे. गेल्या काही वर्षांमध्ये कमलनाथ यांना अनेक मुद्द्यांवरून भाजपाने वारंवार लक्ष्य केलं आहे. १९८४ च्या शीखविरोधी हत्याकांडातील त्यांच्या कथित भूमिकेमुळे भाजपामधील एक मोठा गट त्यांना पक्षात प्रवेश देण्याच्या विरोधात आहे. तरी मध्य प्रदेशमध्ये भाजपाला मजबूत करण्यासाठी पक्षश्रेष्ठी कमलनाथ यांना भाजपात घेण्यास तयार असल्याचे बोलले जात आहे. दरम्यान, कलमनाथ यांनी गेल्या आठवड्यात प्रसारमाध्यमांसमोर बोलताना स्पष्ट केले होते की, माझा पक्षबदलाचा विचार नाही. तरीदेखील त्यांच्या भाजपा प्रवेशाच्या चर्चा थांबलेल्या नाहीत. अशातच आज (२७ फेब्रुवारी) पुन्हा एकदा प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधिंनी कमलनाथ यांना भाजपा प्रवेशाबाबत विचारले. तुमच्या भाजपा प्रवेशाच्या चर्चांना पूर्णविराम कधी लागणार? असा प्रश्न कमलनाथ यांना विचारण्यात आला. यावर कमलनाथ संतापून म्हणाले, तुम्ही पत्रकारच या अशा अफवा उडवता आणि नेत्यांकडून स्पष्टीकरण मागता, त्यांना त्या अफवांचे खंडण करायला लावता. ज्येष्ठ काँग्रेस नेते कमलनाथ म्हणाले, ही अफवा तुम्ही प्रसारमाध्यमांनीच पसरवली आहे. दुसरी कुठलीही व्यक्ती याबाबत काही बोललेली नाही. तुम्ही कधी माझ्या तोंडून असे काही ऐकले आहे का? किंवा मी कधी तसा इशारा दिला आहे का? तुम्ही माध्यम आधी बातमी चालवता आणि मला विचारता. त्यामुळे तुम्ही लोकांनीच या बातम्यांचे खंडण केले पाहिजे. मध्य प्रदेश विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेसचा दारूण पराभव झाल्यानंतर कमलनाथ यांची काँग्रेस प्रदेशाध्यक्षपदावरून उचलबांगडी करण्यात आली. या निवडणुकीत भाजपाने २३० जागांपैकी एकूण १६३ जागांवर विजय मिळवला होता. तर काँग्रेसला केवळ ६६ जागांवर विजय मिळाला. त्याचबरोबर देशभरातील राज्यसभेच्या रिक्त जागांवर नुकतीच निवडणूक पार पडली. यावेळी कमलनाथ यांना राज्यसभेची उमेदवारी मिळेल, असे बोलले जात होते. स्वतः कमलनाथ यांनीदेखील तशी अपेक्षा व्यक्त केली होती. परंतु, तसे झाले नाही. राहुल गांधी यांनीदेखील कमलनाथ यांना उमेदवारी देण्यास विरोध केल्याचा दावा केला जातो. या सर्व कारणांमुळे कमलनाथ हे नाराज असल्याचे म्हटले जात आहे.


# अभिजात मराठी आणि भाषेविषयी अनास्था



श्रीपाद टेंबे
संपर्क क्र. ९१५८०८८०४२
आधुनिक केसरी

**२७ फेब्रुवारी, म्हणजे आज प्रख्यात साहित्यिक कुसुमाग्रज अर्थात वि.वा. शिरवाडकर यांचा जन्मदिवस. त्यांचा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा केला जातो आणि मराठी भाषेच्या अभिजात दर्जाबद्दलची चर्चा सुरु होते. अनेक वर्षापासून महाराष्ट्राकडून मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याची मागणी होत आहे, पण ती अजून पूर्ण झालेली नाही. प्रशासनाच्या अनास्थेमुळे हा प्रश्न आजही प्रलंबित आहे. एका विस्तृत जनसमूहाच्या सामाजिक जीवनाची धारणा करते तिला भाषा असं म्हटलं जातं.**

अर्थात, भाषा म्हणजे काही मोजक्या शब्दांचं संकलन नव्हे तर, काळाच्या भाळावर स्वर होऊन समाजाच्या वैचारिक आणि जाणिवात्मक संचिताला पुढे नेणारी आणि परिवर्तनशील मानवी जीवनाला अखंडता, आकार आणि आशय प्रदान करणारी एक समर्थ व्यवस्था असते. संस्कृतीची रूपे उजागर होण्याची व करण्याच्या सांकेतिक माध्यमात भाषा अतिशय महत्वाची आहे. अभिजात मराठी भाषेसबंधीची चर्चा गेल्या काही वर्षापासून वारंवार म्हणजे मराठी भाषा दिन जवळ आल्यावरच ऐकायला मिळते आहे. केंद्र शासनाच्या वतीने काही भाषांना अभिजात भाषेचा दर्जा दिला गेला. त्याचे काही निकष ठरविण्यात आले. यापूर्वी संस्कृत, कन्नड, तेलगु, तमिळ, मल्ल्याळम, ओडिया या भाषांना अभिजात भाषेचा दर्जा देण्यात आला. भाषेचे प्राचीनत्व आणि त्या भाषेत समृद्ध ग्रंथ निर्मितीची परंपरा हा निकष मानण्यात आला. मराठी भाषेला अभिजात भाषा म्हणून मान्यता मिळावी म्हणून महाराष्ट्र शासनाने सातत्याने पाठपुरावा केला. २०१२ साली रंगनाथ पठारे यांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यासकांची एक समिति नेमण्यात आली. या समितीने २०१३ साली केंद्र शासनास त्याचा  अहवाल सादर केला. भाषेची प्राचीनता , तिची मौलिकता आणि सलगता, त्या भाषेतील वांङमयीन परंपरेची स्वतंत्रता व प्राचीन भाषेच्या उगम व परंपरेबद्दल महत्वाचा विचार या अहवालात आहे. मराठीच्या प्राचीन खुणा, परंपरा आणि ऐतिहासिकतेच्या मागोवा या अहवालात आहे. मराठी भाषेच्या प्राचीन समृद्ध परंपरेचा नकाशा त्यामध्ये आहे. या समितीच्या अहवालानुसार मराठी भाषेचे वय कमी जास्त अडीच हजार वर्षे इतके जुने आहे. मराठी भाषेचा उगम काळ ठरविण्यात तशा अडचणी खूप आहेत. मराठीतल्या रूढ अभ्यास परंपरेची त्यास मर्यादा होती. शाळा, महाविद्यालये, विद्यापीठांतून आतापर्यंत मराठीचा उगमकाळ अकरावे-बारावे शतक मानले गेले. पाठ्यपुस्तकातून देखील हेच शिकवले गेले. मात्र, त्या आधीही किती तरी शतके मराठी भाषा बोलली जात होती, लिहिली जात होती असं इतिहास सांगतो. मात्र, मराठी अभ्यास परंपरेला या भाषा उगमकाळाचा शोध घेता आला नसल्यामुळे एक ठोबळ विचार स्थिर झाला. संस्कृत, प्राकृत किंवा दोन्हीमधून निर्माण झालेली किंवा संस्कृतपासून विशिष्ट दिशेने परावर्तीत झालेली, असा विचार मांडला गेला. मराठी भाषा उगमाची विविध मते मांडली गेली. पर्यायी शक्यतांचा विचार झाला. मराठी भाषेच्या व्यत्पत्तीसंबंधांकडे नव्याने बघितले गेले. परंतु ज्याप्रमाणे मराठी भाषा परंपरेकडे पाहणे महत्वाचे ठरते, परंतु या दिशेने फारसा विचार होतांना दिसत नाही महर्षी वित्तल रामजी शिंदे यांनी मराठी भाषा परंपरेबद्दलचे एक विधान केले होते. ते असे, ‘हल्ली आम्ही इंग्रजी शिकलेले लोक मराठी म्हणून जी भाषा बोलतो आणि लिहितो ती अशिक्षित बहुजन समाजास विशेषतः ग्रामीण भागात वास्तव्य करणाऱ्यास कळत नाही. याचे मुख्य कारण आमचे शब्द जरी मराठी असले तरी विचार इंग्रजी असतात.’ मराठी भाषा ही जगातील आणि भारतातील एक महत्वाची भाषा आहे. महाराष्ट्राबरोबरच अन्य ठिकाणी ती बोलली जाते. अशा भाषेच्या संवर्धनासाठी विस्तारासाठी अधिक पायाभूत आणि मूलगामी प्रयत्न होणे गरजेचे आहे. २०१० साली महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण डॉ.आ.ह.साळुंखे यांच्या समितीने सादर केले होते. या अहवालाकडे सांस्कृतिक क्षेत्रातील मंडळींचे आणि सुजाण नागरिकांचे लक्ष गेले नाही.




आज मराठी भाषा आणि संस्कृतीविषयक कमालीची अनास्था सर्वत्र आपल्याला बघायला मिळत आहे. साधे उदाहरण शहरी भागात सर्व दुकानांवरचे फलक मराठीत असावे असा आदेश असूनही त्याचे पालन होतांना दिसत नाही. शिक्षणाच्या माध्यमांबाबही हीच तऱ्हा आढळते. भाषा संस्कृतीच्या सर्वसमावेशक धोरणाबाबत व्यापक पातळीवर आणि पायाभूत पातळीवर प्रयत्न होतांना दिसत नाहीत. विज्ञान-तंत्रज्ञानाची भाषा मराठी होऊ शकलेली नाही. महाविद्यालये, विद्यापीठ पातळीवर देखील मराठी भाषेबाबतची मोठी अनास्था आहे. महाराष्ट्रातील विविध भागातील बोलींचे सर्वेक्षण-संकलन-अभ्यास तसेच लोकसाहित्याचा व प्राच्य विद्येचा गंभीर अभ्यास होतांना दिसत नाही. तंत्रज्ञानकाळ तसेच या काळाची माध्यमे लक्षात घेता तशा भाषा वापराची, लेखन पद्धतीचे साधने-माध्यमे विकसित होतांना दिसत नाही. विद्यमान जग आणि भविष्यातील आव्हाने ओळखून मराठी भाषा सक्षम आणि विस्तारित व्हायला हवी. समाजाचे प्रजासत्ताकीकारण होते तेव्हा भाषिक संस्कृतीचा गुरुत्वमध्य अभिजनांपासून सरकून बहुजनांच्या जवळ येत असतो. त्यामुळे आविष्काराच्या विविधतेला आणि प्रायोगिक कृतींना महत्व येते. अशाप्रकारे महाराष्ट्रात स्वातंत्र्योत्तर काळात भाषाविष्काराचे प्रजासत्ताकीकरण मोठ्या प्रमाणात झाले. परंतू ज्ञानव्यवस्थेत व प्रमाणिकरणात त्याचे प्रतिबिंब उमटले नाही. कधी कोणे एकेकाळी ‘तैसी पुष्पांमाजी पुष्प मोगरी, की परिमळांजी कस्तुरी, तैसी भाषांमाजी साजिरी मराठीया’ मराठी भाषेचा गौरव केला जायचा, आज मात्र असे म्हणवत नाही. त्यासाठी मराठी भाषेच्या क्षमता अधिक विस्तारित होण्याची गरज आहे. सार्वत्रिक तसेच संस्थात्मक पातळीवर पायाभूत धोरणांची आणि त्यांच्या अंमलबजावणीची नितांत गरज आहे.

# साहित्यिक समाजाला जगवतात



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301
आधुनिक केसरी

**संस्कार हे समजिक संस्कृतीला बळकटी देत असतात.संस्कारांची मुळ जितकी घट्ट तितकी सामाजिक संस्कृती मजबूत असते. साहित्यिक हे समाजाला जागत ठेवत असतात जेणेकरून सामाजिक संस्कृती दुबळी होऊन संस्कृतीची लयलूट होणार नाही. संस्कार हे संस्कृतीच व समाजाचं मुळ असल्याने मुळावर अघात झाला कि झाड आपोआप कमकुवत होऊन दुबळ होत. दुबळ झाल्यानंतर समुळ नष्ट होण्यासाठी फार वेळ लागत नाही.समाजाच घट्ट असं पाळंमुळं असणारे संस्कार आणि त्यांच संस्कार वर कोणीही हल्ला करून संस्कृती आणि पर्यायाने समाज कमकुवत करू नये म्हणून साहित्यिक समाजाला नेहमी जागवतात.आपल्या कार्याचा जागर अखंड तेवत ठेवतात.  संस्कारावर हल्ला झाला कि त्याचे परिणाम आपोआप संस्कृती वर समाजावर पर्यायाने राष्ट्र वर होत असतात. साहित्यिक हे संस्कारावर हल्ला होऊन समाज देश प्रभावीत होऊ नये म्हणून सदैव समाजाला जागृत ठेवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करतात असतात.**

साहित्य हे अमृत धार आहे.ज्याची बरसात साहित्यिक वेळ प्रसंग कालावधी नुसार त्या त्या वेळी करत असतात. सामाजिक संस्कार व सांस्कृतीक जीवन मुल्य रक्षणात साहित्यिकांचे अनमोल योगदान असते.पवित्र्या म्हणजेच संस्कार आणि हाच संस्कार आपलं मुल्य निश्चित निर्धारित करत असतो ठरवत असतो.आपण स्वतः काही केलं काय अथवा नही केलं काय पण आपलं मुल्य वाढविण्यासाठी वृद्धिंगत करण्यासाठी सार्वजनिक पातळीवर एक त्रस्थ शक्ति सतत सदैव कार्यरत असते.हि त्रस्थ शक्ति म्हणजे साहित्यिक असून शरिर मन बुद्धी विचार आणि कृती ने व्यक्ति पवित्र झाला पाहिजे.तसच आपलं पावित्र्य काय आहे हे स्वतःला समजलं पाहिजे. तसंच शरिराचे मनाचे बुद्धी विचारांचे पावित्र्य टिकवून रहिल पाहिजे तसंच ते वृद्धिंगत झाल पाहिजे म्हणून साहित्यिक हे सद विचारांची पेरणी निस्वार्थ भावनेने करत सामाजिक हित जोपासत असतात.संस्कार आणि संस्कृती याची लयलुट हि समाजाच्या अधिपतनास जबाबदार असते . संस्कारांची लयलुट होता कामा नये हिच लयलुट थांबविण्यासाठी साहित्यिक आपलं जीवन समर्पित करतात.संस्कार आणि संस्कृती टिकवणे वाढवणे हा विराट उदेश डोळ्यासमोर ठेवून साहित्यिक रात्रंदिवस लोक जागृती करत असतात.आक्रमण अतिक्रमण हे कधीही अगोदर संस्कारांवर होत असतं आणि मग आपोआप संस्कृती समाज हे प्रभावीत होत असतात.नंतर त्याचे विस्तृत परिणाम हे समाज व्यवस्थेवर होत असतात.गावोगावी गल्लोगल्ली रात्री अपरात्री चोरांचा त्रास होउ नये अथवा चोर येऊ नये या उद्देशाने गुरखी कडा पाहरा देत सगळ्यांना जाग राहण्याच आव्हान रात्रभर करत असतात.यामुळे अनेक ठिकाणी चोरांना चोरी करण शक्य होत नाही.आपणही तो आवाज ऐकून जागे होतो.तसंच सगळ्यांना जाग ठेवणं हाच मुख्य हेतू उदेश गुरखी यांचा असतो.साहित्यिक हे समाजात अहोरात्र जागृती निर्माण करून प्रबोधन करत असतात ज्याचा परिणाम स्वरूप आपण आपले संस्कार आणि संस्कृती जीवनमूल्ये याच्या प्रति सचेत होतो. प्राचिन काळी जेव्हा जेव्हा आपल्या देशावर परकियांची आक्रमण झाली त्या त्या वेळी त्यांनी अगोदर आपली पुस्तकालय जाळली नष्ट केली. महणजे त्या मागे हेतू हाच होता आणि आपले मूळ संस्कार नष्ट करून त्यांचे संस्कारा आपल्याला स्वीकारण्यास भाग पाडण पण तरी सुद्धा त्या वेळी आपल्य ऋषी मुनी यांनी हे तत्वज्ञान गुरू शिष्य परंपरा निर्माण करत जतन केले टिकवले पुढं नेले व आपल्या संस्कार संस्कृती चे रक्षण केले. आज सुद्धा पश्चिमात्य देशातील अनेक घटना घडामोडी ह्या आपले संस्कार नष्ट करण्यासाठी टपुन आहेत.परंतु साहित्यिक समाजाला नियमित जागृत ठेवत असल्याने संस्कार आणि संस्कृती वर आक्रमण करणार्या पश्चिमात्य देशातील वृत्ती प्रवृत्ती यांना साहित्यिक शिरकाव करू देत नाहीत. म्हणजे एकंदरीत आपली संस्कृती संस्कार आणि जीवनमूल्ये रक्षणासाठी साहित्यिक स्वतः कडक पाहरा देऊन आपल्याला सदैव जगत ठेवतात.हि समाजाच्या प्रति साहित्यिक यांची खुप मोठी उदात्त भावना आणि जबाबदारी आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं  ए -३२,  छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# शेतकऱ्यांचा श्रीरामपूरमधील ट्रॅक्टर मोर्चा गाजणार

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** शेतकऱ्यांच्या कृषी मालाला किमान आधारभूत किंमती (एम.एस.पी)च्या कायदेशीर हमीबद्दल शेतकऱ्यांच्या,'दिल्ली चलो'आंदोलनाला देशभरातून पाठींबा लाभत असून कर्जमाफीचा पाठिंबा,एम.एस.पी.कायदा आणण्यात अवास्तव विलंब झाल्यामुळे संतप्त अ.नगर जिल्ह्यातील नेवासा येथील सिफाचे अध्यक्ष रघुनाथ दादा पाटील व शेतकरी संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड. अजित काळे यांच्या नेतृत्वात शेतकरी उद्या दि.२७ फेब्रुवारी रोजी नेवासा येथून श्रीरामपूर येथील प्रांत कार्यालयावर थेट ट्रॅक्टर रॅली काढत असून त्यास मोठ्या प्रमाणावर पाठींबा मिळत असल्याच्या बातम्या हाती आल्या आहेत.
आपल्या विविध मागण्यांसाठी शेतकरी संघटना पुन्हा एकदा रस्त्यावर उतरल्या असून,पंजाब हरियाणातील हे शेतकरी आता दिल्लीकडे कूच करीत आहेत. त्यामुळे हे आंदोलन आता पंजाब, हरियाणासह उत्तरेतील अनेक राज्यांसह महाराष्ट्रातही पसरण्याची शक्यता वर्तवली जात असून ती खरी होताना दिसत आहे. दरम्यान या शेतकऱ्यांना दिल्लीच्या बाहेर रोखून सरकार त्यांना तेथून परतून रावण्याच्या प्रयत्नात असताना या आंदोलनाची व्याप्ती वाढताना दिसत आहे. पंजाब पोलिसांनी शेतकऱ्यांना पुढे जाण्यास मज्जाव केला.या आंदोलकांना पांगविण्यासाठी पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्याही फोडल्या असून यात एका तरुण शेतकऱ्याचा बळी गेला आहे.त्यामुळे हे आंदोलन आता आणखी तीव्र होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.सरकार त्यांना चर्चेसाठी निमंत्रण देत असले तरी त्यात गंभीरता दिसत नाही त्यामुळे त्यात वेगळे काही साध्य होण्याची शक्यता नाही केवळ आगामी निवडणूका काढण्यासाठी चलढकल होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.त्याचे पडसाद आता महाराष्ट्रसह राजस्थान,मध्यप्रदेश, आदी राज्यातही उमटताना दिसत आहे. उत्तर नगर जिल्ह्यात या विरुध्द रघुनाथ दादा पाटील यांच्या शेतकरी संघटनेने अड्.अजित काळे यांच्या नेतृत्वात नूतकेच लाक्षणिक उपोषण करून पाठींबा दिला होता.
आता तर थेट नेवासा येथून श्रीरामपूर येथील प्रांत कार्यालयावर 'ट्रॅक्टर रॅली' काढताना दिसत असून त्यासाठी मोठी तयारी झाली असल्याचे दिसत आहे. त्यासाठी गावोगावचे शेतकरी वर्गणी करून ट्रॅक्टर पाठविण्यासाठी प्रयत्नशील आहे.त्यामुळे प्रशासन त्यांना पंजाब-हरियाणातिल अंदोलनासारखे बाहेर रोखण्याचा प्रयत्न करण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. दरम्यान या आंदोलनात शेतकऱ्यांनी आपल्या कृषी मालाच्या किमान आधारभूत किंमती(एस. सम.पी.)च्या हक्कासाठी रस्त्यावर उतरणे गरजेचे आहे; तरच शेतकरी वाचणार आहे.त्यासाठी शेतकऱ्यांनीं हजारोंच्या संख्येने सामील व्हावे असे आवाहन शेतकरी संघटनेचे जिल्हा अध्यक्ष अनिल औताडे यांनी केले आहे.
या प्रकरणी शेतकरी संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड. अजित काळे यांचेशी संपर्क साधला असता त्यांनी, शेतकऱ्यांना अनुदानापेक्षा शेतमालासाठी निर्यात खुली करणे सह डॉ.एस.एस.स्वामीनाथन यांच्या शिफारशी लागू करणे गरजेच्या आहेत तरच शेतकरी जगणार आहे.सरकार शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणार होते त्याचा सरकारला विसर पडला आहे.सरकार फुकट खाणारांची तोंडे वाढवत असून अन्नधान्य पिकवणाऱ्यास मात्र उपाशी मारत आहे.हि बाब खेदजनक असल्याची संतप्त प्रतिक्रिया नोंदवली आहे.

# शिळ्या कढीला ऊत आणणारा अर्थसंकल्प

## विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांचे अंतरिम अर्थसंकल्पावर टीकास्त्र

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यातील शेतकरी, बेरोजगार, मध्यमवर्गीयांची फसवणूक करणारा अर्थहीन अर्थसंकल्प आज राज्य सरकारने सादर केला आहे. विकासाचे दिवास्वप्न दाखवणारा अर्थसंकल्प सरकारने राज्याच्या माथी मारला आहे. 99 हजार कोटींची राजकोषीय तूट म्हणजे राज्याची दिवाळखोरीकडे वाटचाल सूरू झाली हे आता लपून राहिले नाही. फसव्या घोषणा अन् पोकळ आश्वासनांची रेलचेल या अर्थसंकल्पात आहे. जुन्या योजना नव्याने मांडलेला हा अर्थसंकल्प म्हणजे शिळ्या कडीला उत आणणारा हा अर्थसंकल्प असल्याचे टीकास्त्र विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी डागले आहे.



राज्य सरकारने अंतरिम अर्थसंकल्प सादर केल्यानंतर श्री. वडेट्टीवार यांनी अर्थसंकल्पावर प्रतिक्रिया देताना राज्य सरकारवर खरमरीत टीका केली आहे.
वडेट्टीवार म्हणाले की, राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्येत वाढ झाली आहे. या सरकारच्या काळात शेतकरी उध्वस्त झाला आहे. अजूनही शेतकऱ्यांच्या पिकाला हमीभाव मिळत नाही. कापूस, सोयाबीनला हमीभावापेक्षा कमी दर मिळत आहे. शेतकरी देशोधडीला लागण्याची वेळ आली आहे. तरी देखील या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी ठोस तरतूद नाही. यावरून शेतकऱ्यांचा सरकारला विसर पडला, हे स्पष्ट आहे.
वडेट्टीवार म्हणाले की, महाराष्ट्र लुटणे हेच सरकारचे लक्ष आहे. राज्याचे प्रमुख ठाण्याचे असले तरी सरकार नागपूरमधून चालते. त्यामुळे अर्थमंत्र्यांनी देखील हा अर्थसंकल्प फक्त वाचून दाखवण्याचे काम केले आहे. या अर्थसंकल्पावर अर्थमंत्र्यांची छाप दिसून आली नाही. हे वास्तव आहे. अर्थ संकल्पात सर्व स्मारकांचा उल्लेख केला. पण पुणे येथील महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्मारकाविषयी ठोस निधीची घोषणा केली नाही. मिहानमध्ये उद्योग वाढीसाठी सरकारचे प्रयत्न दिसून आले नाहीत. महिलांसाठी विशेष तरतूद करण्यात आली नाही. लेक लाडकी योजनेची प्रभावी अंमलबजावणी सरकारला करता आली नाही. अंगणवाडी सेविकांना मोबाईल देता, सौर उर्जा उपकरण देता कारण तुम्हाला कॉंन्ट्रॅक्टर जगवायचे आहेत. परंतु या अंगणवाडी सेविका पगारासाठी आंदोलन करत असताना त्यांची मागणी मान्य केली जात नाही हे दुर्दैव आहे.
वडेट्टीवार म्हणाले की, राज्य कर्जबाजारी झाले आहे. महाविकास आघाडीने राज्य आर्थिक सुस्थितीत आणले होते. पण महायुतीने पुन्हा खड्ड्यात घातले आहे. जाएसटी परतावा 8 हजार कोटींचा सांगितले. पण केंद्राकडून अजून किती येणे आहे याचा उल्लेख नाही. 1 ट्रीलीयन डॉलरची अर्थव्यवस्था निर्माण करण्याचं पंतप्रधानांचे स्वप्न हे दिवास्वप्न ठरणार आहे. कारण आर्थिक स्थितीचा बोजवारा उडला आहे. डाओसला 3 लाख कोटींचे करार झाल्याचा दावा करण्यात आला. परंतु गुंतवणूक कोठे गेली. रोजगार निर्मिती का झाली नाही हे मात्र सांगितले गेले नाही. अतिविशाल प्रकल्पांना किती निधी देणार त्याचा तिजोरीला किती भुर्दंड बसणार याचा देखील उल्लेख केला नाही. गतवर्षीच्या अर्थसंकल्पातील 50 टक्केच निधी खर्च झाला आहे. केलेल्या घोषणा हवेत विरल्या आहेत. पायाभूत सुविधांसाठी भरमसाठ काढलेल्या कर्जाच्या व्याजापोटी किती रक्कम जाते. विकासवर किती खर्च होते यावर काही बोलले जात नाही. गतवर्षीचं पंचामृत कोणाला मिळाल हा संशोधनाचा विषय आहे, अशा शब्दात वडेट्टीवार यांनी वाभाडे काढले आहे.



# स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव झाली तर त्यातच देव आहे : नंदगिरी महाराज

आधुनिक केसरी न्यूज

**फलटण :** स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव झाली तर त्यातच देव आहे, आई वडिलांना पेक्षा मोठे दैवत नाही असे प्रतिपादन प. पू. तपोनिधी शिवयोगी नंदगिरी महाराज यांनी केले.
मराठी राजभाषा दिनानिमित्त आयोजित धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक जगन्नाथ शिंदे हे होते. ॲग्रोवन न्यूज परिवारातर्फे दिला जाणारा अत्यंत मानाचा साहित्य पुरस्कार संभाजी नगर येथील जेष्ठ कवी व साहित्यिक केशव भवानी काळे यांच्या " होय ! हे असंच आहे " या आत्मचरित्राला या वेळी प्रदान करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना केशव काळे म्हणाले की, फलटण हे छत्रपती संभाजी महाराजांचे आजोळ आहे,येथे साहित्य संमेलन होत आहे याचा विशेष आनंद होत आहे, मराठी भाषेचे संरक्षण आणि संवर्धन होऊन त्याचा प्रसार व्हावा अशी अपेक्षा केशव काळे यांनी व्यक्त केली.
या वेळी नितीन बानगुडे पाटील यांना छत्रपती संभाजी महाराज साहित्य सेवा जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार स्वीकारण्यासाठी संभाजीनगरहून मानसिंगराव पाटील सर व बाजीराव खांदवे उपस्थित होते.
अध्यक्ष श्री. प्रकाश सस्ते व पुरस्कार समिती प्रमुख प्रा. विजय काकडे यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी खूपच मेहनत घेतली.

# नागपूर-नागभीड रेल्वेमार्गातील अडथळा दूर

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** उमरेड-पवनी-करांडला अभयारण्यातून जात असलेल्या या रेल्वेमार्गाला राष्ट्रीय वन्यजीव मंडळाने मान्यता दिल्याने नागपूर, भंडारा आणि चंद्रपूर जिल्ह्याला जोडणारा रेल्वेमार्ग पुढील सहा महिन्यात पूर्ण होण्याची शक्यता आहे. नागपूर (इतवारी) ते नागभीड या १०६.२ किलोमीटर नॅरोगेज रेल्वेमार्गाचे ब्रॉडगेजमध्ये रूपांतर करण्यात येत आहे. नागपूर ते उमरेडपर्यंतचे काम अंतिम टप्प्यात आहे. परंतु, उमरेड ते नागभीड या दरम्यानचे काम ठप्प आहे. यापैकी १६ किलोमीटरचा रेल्वेमार्ग उमरेड-पवनी-करांडला अभयारण्यातून जात आहे. त्यामुळे या रेल्वेमार्गाच्या मान्यतेसाठी प्रारंभी राज्य वन्यजीव मंडळ आणि भारतीय वन्यजीव संस्था, डेहराडून यांच्या कसोटीतून जावे लागले.



# राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयाचा दणदणीत विजय

आधुनिक केसरी न्यूज

**राजेंद्रकुमार शेळके**

**पुणे :** जिल्हा शिक्षण मंडळाच्या कॉलेज ऑफ फार्मसी, हडपसर महाविद्यालयात केमिस्ट असोसिएशन पुणे जिल्हा येरवडा व शिरूर झोन आयोजित राज्यस्तरीय डिप्लोमा फार्मसी क्रीडा स्पर्धा २०२३-२४ आयोजित करण्यात आल्या होत्या.
यावेळी पीडीए शंकरराव उरसळ कॉलेज ऑफ फार्मसी खराडी संघ व समन्वयक सौ. कांचन बुचडे, डिलाईट इन्स्टिट्यूट कॉलेज ऑफ फार्मसी,कोरेगाव भीमा संघ व समन्वयक प्रा. जीवन राजगुरू, लोकसेवा कॉलेज ऑफ फार्मसी फुलगाव संघ व समन्वयक प्रा. पुनम गवारी, चेतना कदम, मंगेश जगताप, सीताबाई थिटे कॉलेज ऑफ फार्मसी शिरूर संघ व समन्वयक प्रा.निखिल केदारी, कॉलेज ऑफ फार्मसी हडपसर संघ व समन्वयक सौ.कल्पना रावडे असे एकूण १५० विद्यार्थी उपस्थित होते तसेच राष्ट्रीय स्तरावरील कबड्डी संघाचे पंच नंदकुमार काळोखे माजी मुख्याध्यापक हिरे हायस्कूल पर्वती, पद्माकर जिजामाता हायस्कूल सुभाष शिंदे, कोहिनूर क्रीडा संघ, भाऊसाहेब नांदगुडे राष्ट्रीय पंच कबड्डी, विजय फरगडे राष्ट्रीय पंच कबड्डी हे यावेळी उपस्थित होते. यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अश्विनी शेवाळे ,पंच नंदकुमार काळोखे,विजय फरगडे यांनी विद्यार्थ्यांना कबड्डी खेळाविषयी थोडक्यात माहिती व नियम सांगितले व त्यांना मार्गदर्शन केले तसेच खेळासाठी शुभेच्छा दिल्या व यावेळी उपस्थित खेळाडूंनी शपथ घेतली .
राज्यस्तरीय कबड्डी क्रीडा स्पर्धेमध्ये कॉलेज ऑफ फार्मसी, हडपसर मधील मुलांच्या संघाने दणदणीत विजय मिळवला तर सीताबाई थिटे कॉलेज ऑफ फार्मसी ,शिरूर या महाविद्यालयातील मुलींच्या संघाने दणदणीत विजय मिळवला यावेळी प्राचार्य डॉ. अश्विनी शेवाळे व सर्व राष्ट्रीय स्तरावरील पंचांनी , पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष राजेंद्र घाडगे, मानद सचिव ॲड.संदीप कदम,खजिनदार ॲड. मोहनराव देशमुख ,उपसचिव एल. एम. पवार व प्रशासन सहसचिव जाधव यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व त्यांना शुभेच्छा दिल्या तसेच या राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन व सूत्रसंचालन महाविद्यालयाचे क्रीडा शिक्षक प्रा. योगेश काक्रंबे व प्रा. निता रुखे, कल्पना रावडे यांनी केले यावेळी महाविद्यालयातील सर्व पदविका व पदवी फार्मसीचे विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर सेवकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन प्रतिसाद दर्शविला.

# लोकशाही आणि संविधान वाचविण्यासाठी मतदारांनी आवाज उठविणे गरजेचे

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** निवडणुकांमधील ईव्हीएमचा वापर लोकशाहीला मारक आहे. देशात लोकशाही आणि संविधान वाचविण्यासाठी मतदारांनी आवाज उठविणे गरजेचे आहे. ईव्हीएमवर आमचा विश्वास नाही. त्यामुळे आगामी निवडणुका बॅलेट पेपरवर घ्याव्यात, अशी भूमिका संविधान विश्लेषक अनंत भवरे, अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अध्यक्ष अविनाश पाटील, कामगार नेते कॉ. एस. यु. तायडे यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत मांडली. लॉर्ड बुद्धा चॅरिटेबल ट्रस्ट जालना आयोजित देश, लोकशाही, संविधान बचाव राष्ट्रीय अभियान अंतर्गत 'ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट हटाव, बॅलेट पेपर लाव' राज्यव्यापी रॅलीचे मंगळवारी धुळे शहरात आगमन झाले. धुळ्यातील संविधान बांधिलकी महोत्सव नागरी संयोजन समिती आणि ईव्हीएमविरोधी कृती समिती, धुळे नागरिकांच्या वतीने रॅलीचे स्वागत महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ करण्यात आले. बाबासाहेबांना अभिवादन करून शहरातील विविध भागात ईव्हीएमविरोधी प्रचार-प्रसार करण्यात आला. संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित प्रबोधनात "ईव्हीएम हटाव, देश बचाव" असा नारा देवून संवाद, चर्चा करण्यात येत आहे. या महाअभियानाची माहिती देण्यासाठी मंगळवारी सायंकाळी 4 वाजता साक्री रोडवरील पत्रकार भवनात पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. या राष्ट्रीय अभियानात सहभागी होण्याचे आवाहन अनंत भवरे (छत्रपती संभाजीनगर), अंनिसचे राज्य अध्यक्ष अविनाश पाटील, एस. यू. तायडे, कॉ. एल. आर. राव, हरीशचंद्र लोंढे आणि सहकारी, ई व्ही एम विरोधी कृती समिती, धुळे आणि धुळे महानगर संविधान बांधिलकी महोत्सव नागरी संयोजन समिती यांनी केले आहे.



# पळसखेड पिंपळे शिवारात अवकाळी; पिकांना फटका

आधुनिक केसरी न्यूज



चक्रीवादळामुळे पळसखेड पिंपळे शिवारात हरबरा, गहू, ज्वारी भुईसपाट झाली. शेडनेट, शेततळ्याची पन्नी फाटली. भाजीपाला व फळबागांचेही नुकसान झाले. घरावरील पत्रेही उडाली. घरावरील पत्रेही उडाली. सुदैवानं जीवितहानी झाली नाही. चक्रीवादळामुळे शेतकऱ्यांचे फार मोठे नुकसान झाले. संबंधित विभागाने पंचनामे केले परंतु तात्काळ आर्थिक मदत जाहीर करावी. अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

**प्रा. बाळासाहेब बोराडे**

**श्रीक्षेत्र राजूर :** काल वातावरणात अचानक बदल झाल्याने राजुरसह पळसखेडा पिंपळे शिवारात सायंकाळच्या सुमारास वादळी वाऱ्यासह गारांचा पाऊस झाला. या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून रब्बी पिकांनाही फटका बसला आहे.दरवर्षीपेक्षा यावर्षी पर्जन्यमान अत्यल्प झाल्याने उत्पन्नातही मोठी घट झाल्याचे दिसून आले.एकीकडे पिकविलेल्या पिकांना हमीभाव मिळत नाही तर दुसरीकडे अस्मानी संकटे शेतकऱ्यांच्या छाताडावर धिंगाणा घालत आहेत. त्यामुळे चौहीबाजूंनी शेतकरी घेरला गेला आहे.काल झालेल्या अवकाळी पावसामुळे रब्बी हंगामातील पिकांचे नुकसान झाले आहे.त्यामुळे संबंधित विभागाने पंचनामे करून तात्काळ मदत जाहीर करावी अशी मागणी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी केली आहे. काल सायंकाळी पळसखेडा पिंपळे शिवारात अचानकपणे वादळ वाऱ्यासह गारांच्या पावसाला सुरुवात झाली होती. त्यामुळे कापूस, गहू, मक्का ,भाजीपाला व फळ पिकांचे नुकसान होऊन शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला आहे. सध्या सगळीकडे सुगीचा हंगाम सुरू आहे. ज्वारी, हरभरा पिकांची काढणी सुरू आहे.सोंगणी दरम्यान पाऊस आल्याने रब्बी पिकं आडवी पडून वाताहत झाली आहे. वाऱ्याचा अतिवेगामुळे अनेकांच्या घरावरची पत्रेही उडून गेली तर शेडनेटचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. प्रशासनाने पंचनामे करून तात्काळ मदत जाहीर करावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.



# संकेत भोसलेच्या मारेकऱ्यांना फाशी द्या

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** भिवंडी येथील दलित विद्यार्थी संकेत भोसले याचा निर्धपणे खून करणाऱ्या आरोपींना फाशीची शिक्षा झाली पाहिजे यासाठीचे आंबेडकरी समाजातर्फे जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

भिवंडी येथील दलित विद्यार्थी संकेत भोसले याचा नुकताच निर्घणपणे खून करण्यात आला. महाराष्ट्र हे फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचारांचा पुरोगामी राज्य मानले जाते. गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्रात दलित अत्याच्याराच्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत. नांदेड येथील तरुण भिमसैनिक अक्षय भालेराव याचा गावात निमजयंती साजरी केली म्हणून निर्घृण हत्या करण्याता आली होती. धुळे जिल्ह्यातील शिंदखेडा तालुक्यातील एका अल्पवयीन आदिवासी मुलीवर अत्याचार करुन हत्या करण्यात आली.अशा अनेक घटना गेल्या वर्षभरापासून महाराष्ट्रात घडत आहेत. संकेत भोसले हा 16 वर्षाचा दलित विद्यार्थी इ. 11 वी चे शिक्षण घेत होता, त्याच्याच कॉलेजमधील विद्यार्थीशी किरकोळ कारणावरुन त्याचा वाद झाला. याचा राग मनात ठेवून संकेतच्या विरोधात आरोपीने कट रचला व दि. 14 फेब्रुवारी 2024 रोजी या विद्यार्थ्यांचे शिवसेना शिंदे गटाचे विभाग प्रमुख कैलास धोत्रे व त्यांचा मुलगा देवा कैलास धोत्रे व त्यांचा भाचा करण लष्कर व अन्य शिवसेनेचे शिंदे गटातील 15 से 20 कार्यकर्ते यांनी अपहरण करुन 3-4 तास डांबून ठेवले व त्या ठिकाणी त्याचा अतोनात छळ करण्यात आला, छळ करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला असे या निवेदनात म्हटले आहे. संकेत भोसले याच्या गुप्तांगावर लाथा बुक्यांनी मारहाण केली व त्याला जीवंत जाळण्याचा प्रयत्न केला. असे माणुसकीला काळीमा फासणारे कृत्य करुन त्याला मारहाण करण्यात आली. रोजी उपचार सुरु असतांना संकेत भोसले याचा मृत्यू झाला. त्यामुळे आरोपींना कठोर शासन होणे आवश्यक आहे. म्हणून संकेतचा खून करणारे आरोपी व त्यांना मदत करणारे त्यांचे गुंड साथीदार यांना फाशीची शिक्षा झाली पाहिजे अशी मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे. ह्या ठिकाणी सर्व परिसरातील समाज बांधव उपस्तित होते



# कोपरगावसह तालुक्यात संत शिरोमणी गुरू रविदास महाराज यांची ६४७ वी जयंती

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** राष्ट्रीय चर्मकार महासंघ संचालित शहर व तालुका चर्मकार संघ यांचे वतीने कोपरगाव येथे श्री संत शिरोमणी गुरू रविदास महाराज यांची ६४७ वी जयंती मोठया उत्साहात संपन्न झाली आहे.

संत रविदास इ.स.१५ ते १६ व्या शतका दरम्यान भक्ती चळवळीचे भारतीय रहस्यंवादी कवी होते. रविदासांच्या भक्तिगीतांचा भक्ति चळवळीवर पंजाब,उत्तर प्रदेश,राजस्थान,महाराष्ट्र आणि मध्य प्रदेश या प्रदेशात गुरू (शिक्षक) म्हणून कायमचा प्रभाव पडला आहे.ते कवी-संत,समाजसुधारक आणि आध्यात्मिक व्यक्तिमत्त्व होते. त्यांची जयंती कोपरगाव सह कोपरगाव तहसील, जवळके याठिकाणी मोठ्या उत्साहात संपन्न झाली आहे.कोपरगावात ती राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने संपन्न झाली आहे. तहसील कार्यालयात तहसिलदार संदीप कुमार भोसले यांनी प्रतिमा पूजन केले यावेळी नायब तहसिलदार चंद्रशेखर कुलथे यांचे सह इतर कर्मचारी उपस्थीत होते. जवळके येथे सरपंच सारिका थोरात यांनी प्रतिमा पूजन केले यावेळी संजय सरवार, अरुण थोरात, विठ्ठल थोरात, अक्षय सरवार, रखमा वाकचौरे व ग्रामस्थ उपस्थित होते. कोपरगाव शहरामध्ये छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाजवळ श्री संत शिरोमणी गुरू रविदास महाराज यांची भव्य अशी प्रतिमा उभारून प्रतिमा पूजन व पालखी पूजन किसन कानडे यांचे हस्ते करण्यात आले. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक येथे शिवरायांच्या पुतळ्याला अभिवादन करुन पुष्पहार घालून पालखी मिरवणुक काढण्यात आली होती.या मिरणुकीत चर्मकार महिलांचे ढोल पथक आणि कु.अक्षरा गणेश कानडे या चिमुकलीने सादर केलेले लाठीकाठी प्रात्यक्षिक हे प्रमुख आकर्षण ठरले होते. सदर प्रसंगी संतोष बनसोडे,रुपाली बनसोडे,राजेंद्र वाघ,रामदास वाघ,राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष दिलीप कानडे, संजय दुशिंग आदी मान्यवर उपस्थित होते.

त्यानंतर प्रमुख पाहुणे खासदार सदाशिव लोखंडे,आ.आशुतोष काळे, संजीवनी सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष विवेक कोल्हे,माजी आ.भाऊसाहेब कांबळे,सरस्वती भाऊसाहेब वाकचौरे,राष्ट्रीय चर्मकार महासंघ उपाध्यक्ष एम.डी.कानडे,उत्तर महाराष्ट्र महीला आघाडी अध्यक्षा मनिषा पोटे,माजी तहसीलदार डी.आर. दुशिंग,भाऊसाहेब कानडे,कोकमठाण सरपंच उषाताई दुशींग,रवंदा सरपंच शोभा भवर,रवंदा उपसरपंच ऋषिकेश कदम,वसंत थोरात, शिवसेना तालुका अध्यक्ष रावसाहेब थोरात,अँड नितीन पोळ,शरद त्रिभुवन राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे कृष्णा आढाव, चंद्रशेखर म्हस्के,आकाश डागा,फकीर कुरेशी,राजेंद्र वाकचौरे,विरेन बोरावके,अनिरुद्ध काळे,नवाज कुरेशी,संजय सरवार आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबिर काळाची गरज : डॉ. राजेश कापसे

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** रुग्णाच्या दृष्टीने बांधिलकी ठेवत मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबिर शिर्डी येथील श्री साईभक्त लक्ष्मीबाई शिंदे ट्रस्ट व आर झुंनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल पनवेल मुंबई तसेच आयोध्या हॉस्पिटल शिर्डी यांनी आयोजित केलेले शिबिर कौतुकास्पद असुन साईबाबांच्या वैद्यकीय सेवेचा वसा खरोखरच आचरणात आणने हिच खरी सेवा असल्याचे मत डॉ. राजेश कापसे यांनी व्यक्त केले.

कापसे म्हणाले की शिर्डी येथे सामाजिक भावनेतून मोतीबिंदू मुक्त शिर्डी परिसर अभियानांतर्गत मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबिर संपन्न झाले वैद्यकीय खर्च मोठ्या प्रमाणावर वाढत असताना अशावेळी सेवाभावी संस्था मोठ्या प्रमाणावर पुढे येण्याची गरज असुन तीच खरी सेवा असल्याचे सांगितले लक्ष्मीबाई शिंदे ट्रस्टचे विश्वस्त अरुणराव गायकवाड व साईराज गायकवाड यांनी सांगितले कि लक्ष्मीबाई शिंदे ट्रस्टच्या माध्यमातून या अगोदर देखील विविध सामाजिक उपक्रम नेहमीच राबविण्यात येतात त्याच धर्तीवर सामान्य गोरगरीब रुग्णाना मोफत वैद्यकीय सेवा सुविधा मिळाली पाहिजे हा हेतु ठेवून शिबिर संपन्न झाले या शिबिरात जवळपास एक हजार नगर सह मराठवाड्यातील रुग्णांनी लाभ घेतला या शिबिरात मोतीबिंदू तपासणी व शस्त्रक्रिया प्रसंगी जाण्याची राहण्याची जेवणाची सुविधा देखील उपलब्ध करून देण्यात आली व मोफत नेत्र तपासणी करून रुग्णाना चष्मा वितरण देखील करण्यात आले या शिबिरात दिवसभर महिला वयोवृद्ध स्त्री पुरुष रुग्णानी आरोग्य सेवेचा लाभ घेतला लगतच्या काळात पुन्हा एकदा असे शिबिराचे आयोजन केले जाणार आहे.




# कर्म. आ.मा. पाटील वरिष्ठ महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**पिंपळनेर :** येथील कर्म. आ. मा. पाटील कला, वाणिज्य व कै. अण्णासाहेब एन.के.पाटील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय, पिंपळनेर येथे मराठी विभागाच्या वतीने कविवर्य कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रा.के.डी.कदम हे होते. यावेळी विचारमंचावर प्रमुख अतिथी म्हणून प्रसिद्ध कवी रावसाहेब कुवर, गझलकार विरेंद्र बेडसे व मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ.सतीश मस्के आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात कविवर्य कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी काव्यवाचन स्पर्धा घेण्यात आली. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कवी रावसाहेब कुवर यांनी 'बुद्ध होण्याच्या प्रक्रियेतून जात असतो कवी', ' ग्रामसभेच्या निमित्ताने,' खेड्यातंली पोरं बसली आहेत येड्यासारखी,' ' खेळायचे खेळ किती,' या कविता सादर करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.त्याचबरोबर गझलकार विरेंद्र बेडसे यांनी गझल म्हणजे काय? गझलेचे प्रकार याविषयी मार्गदर्शन करून 'टाळलेस तू मागे बघणे वळता वळता, 'तिच्या स्पर्शामुळे येते,' 'टेकले हात दोन्ही बिवाऱ्यापुढे या गझल सादर केल्या. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य प्रा. के.डी.कदम म्हणाले की, विद्यार्थ्यांनी साहित्य वाचले पाहिजे.कविता केल्या पाहिजेत असे सांगून काही कवींच्या कविता सादर करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. काव्यवाचन स्पर्धेचे परीक्षक म्हणून डॉ. आनंद खरात व प्रा. सी.एन. घरटे आदिंनी केले. काव्यवाचन स्पर्धेत प्रथम कु. चेतना निकुम, द्वितीय प्रशांत दत्तात्रय पगारे, तृतीय कु.यज्ञेश्री सतीश धायबर व उत्तेजनार्थ इंद्रायणी घाणेकर आदींनी क्रमांक मिळविला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. डॉ. सतीश मस्के यांनी केले. आभार प्रा.सी.एन.घरटे यांनी मानले. कार्यक्रमाला डॉ. एन.बी.सोनवणे, डॉ. वाय.एम.नांद्रे, प्रा.एम.व्ही.बळसाने, डॉ. संजय खोडके,प्रा. डी.बी.जाधव, डॉ. के.एन. वसावे आदी उपस्थित होते. यावेळी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मनोहर बोरसे, सुनील गुरव, कैलास जीरे, राजु ढोले इ. कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.



# साहेब नसते तर मराठवाड्याचा वाळवंट झाला आसता : प्रा. संतोष गव्हाणे





आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** येथील संत ज्ञानेश्वर उद्यानातील स्व.शंकरराव चव्हाण, माजी गृहमंत्री भारत सरकार यांच्या पुण्यतिथी निमित्ताने पुर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार घालुन सोमवारी अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी प्रा.संतोष गव्हाणे यांनी प्रतिपादन केले कि जर स्व.शंकरराव चव्हाण नसते तर मराठवाड्याचा वाळवंट झाला आसता, कारण गोदावरी नदीवर सर्वात मोठे मातीचे धरण उभारून मराठवाड्यातील पिण्याच्या तसेच सिंचनाचा प्रश्न त्याच्यामुळेच आजही सुजलाम सुफलाम आहे. परंतु त्यांच्या पुण्यतिथी ला पैठणकर विसरल्याची खंत व्यक्त करत संत ज्ञानेश्वर उद्यानातील पुर्णाकृती पुतळ्याची दुरावस्था होत असुन त्याठिकाणीच्या फरशा अथवा सुशोभीकरण अद्यापही ठेकेदारानी केले नसल्याने संताप व्यक्त होत आसुन संत ज्ञानेश्वर उद्यानातील सुरू असलेली कामे दर्जाहीन होत असल्याची पाहणी उद्यान बचाव समितीच्या सदस्यांनी त्या निमित्ताने सोमवारी केली. यात जुन्याच कामाला डागडुजी न करता गेरुचा कलर मारल्याचे चित्र दिसते.तसेच फरशाचीची कुठेच दुरुस्ती झाली नसुन फाउंनटन बसवलेल्या ठिकाणी चिरा पडलेल्या ठिकाणी व्हॉईट सिमेंट भरल्याचे दिसते. तर जुन्या सिमेंटच्या कामाला कुठलेही दुरुस्ती न करता गेरू चा कलर मारण्यात येत आसल्याने उद्यान बचाव समितीचे सदस्य प्रा.संतोष गव्हाणे,संतोष गोबरे,रमेश लिंबोरे,बाळु आहेर यांनी संत ज्ञानेश्वर उद्यानातील सध्या सुरू असलेली कामे दर्जाहीन होत असल्याने संबधित ठेकेदाराची मनमानी सुरू असुन उद्यानातील होत असलेल्या कामावरील ठेकेदारावर पाटबंधारे विभागाचे लक्ष नसल्याने दर्जेदार कामे होताना दिसत नाही, त्यामुळे या कामाची चौकशी करण्यात यावी अशी मागणी या वेळी केली.

संत ज्ञानेश्वर उद्यानात सध्या जी कामे उद्यान सुरू करण्याच्या अनुषंगाने होत आहेत ते थातुरमातुर होत असुन, पाण्यातील कांरजाची संखा कमी करण्यात आली असुन ठेकेदाराचा मनमानी कारभार चालु असून फाउंनटनच्या भिंतीच्या चिरा बुजवून कलर देवुन फाउंनटनच्या बाहेरील भागातील दुरुस्ती न करता जुन्याच सिमेंट बांधकामला गेरू चा कलर मारण्यात आला असुन सर्वच कामे दर्जाहीन होत असल्याने पालकमंत्री यांनी लक्ष देणे गरजेचं आहे . **प्रा .संतोष गव्हाणे, उद्यान बचाव समिती, सदस्य**

# झोपड्यात राहणाऱ्यांचा घरकुल योजनेत समाविष्ट करा : माजी उपनगराध्यक्ष सोनुले

आधुनिक केसरी न्यूज

**सिध्दार्थ वाठोरे**

**हदगाव :** केंद्र आणि महाराष्ट्र शासनाचे प्रधानमंत्री घरकुल योजना



घराघरात पर्यंत पोहोचवून गावठाण आणि गायरान जमिनीवरील झोपड्या, कोपड्या, कच्चा घरधारक नागरिकांना प्रधानमंत्री घरकुल योजनेच्या शासकीय घरकुलाचा लाभ देऊन त्यांचे राहणीमान उंचवावे या शासनाच्या ध्येयधोरणाला हदगाव महसुली, नगरपालिका प्रशासन गंभीर्याने घेत नसून प्रधानमंत्री घरकुल योजनेला गायरान गावठाण जमिनीचे कारण पुढे करून शहरातील नागरिकांना प्रधानमंत्री घरकुल योजनेच्या लाभापासून वंचित ठेवून केंद्र आणि महाराष्ट्रशासनाच्या घरकुल योजनेच्या ध्येय धोरणाला हरताळ फासण्याचे काम येथील प्रशासन करीत असल्याचे जनतेत बोलल्या जात आहे. हदगाव शहरातील नगरपालिके अंतर्गत आणि अधिपत्याखाली गावठाण, गायरान जमिनीवर गेल्या २५ ते ३० वर्षापासून ऊन वारा पाऊस पाणी ह्याची तमा न बाळगता खोपड्या, झोपड्या टाकून कच्च्या घरात वास्तव्यास राहून आपापला प्रपंच चालवीत नगरपालिका, विधानसभा, लोकसभा या सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावून राष्ट्रीय कार्य करणाऱ्या नागरिक कुटुंबांना नगरपालिका प्रशासनाने नळ कनेक्शन. विद्युत वितरण कंपनीने विद्युत कनेक्शन दिली असताना ते नागरिक अद्यापही प्रधानमंत्री आवास योजनेपासून वंचित राहिलेल्या गायरान, गावठाण जमिनीवर 25,30 वर्षापासून वास्तव्यात असलेल्या नागरिकांना शासनाने आणि माननीय जिल्हाधिकारी नांदेड यांनी शासनाच्या घरकुल योजनेत समाविष्ट करून प्रधानमंत्री घरकुल योजनेचा लाभ देऊनत्यांची "ऊन,वारा," "पाऊस, पाणी." यांच्या पासून त्यांचा आणि त्यांच्या कुटुंबाचा बचाव करून त्यांच्या निवाऱ्यांचा प्रश्नाचे निरंकण करून त्यांची नावे शासनाच्या घरकुल योजनेत समाविष्ट करून शासनाच्या घरकुल योजनेचा लाभ देऊन त्यांचे राहणीमान उंचवावे अशी आशयाची मागणी हदगाव नगरीचे उपनगराध्यक्ष सुनील भाऊ सोनुले यांनी केली आहे.



# रोहिदास समाज पंचायत संघाच्या वतीने संत शिरोमणी संत रोहिदास जयंती साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** रोहिदास समाज पंचायत संघ, मुंबई विभाग समिती क्रः ५ (प्रभादेवी ते माहिम) ह्या संघाच्या वतीने संत शिरोमणी संत रोहिदास जयंती, संत रोहिदास चोक, जगन्नाथ भातणकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई येथे उत्साहात पार पडला. ह्या सोहळ्यास प्रमुख उपस्थिती नारायण तिवरेकर- विभाग अध्यक्ष, शरद कांबळे- अध्यक्ष भाजपा अनुसूचित जाती मोर्चा. कृष्णा मेढेकर-माजी उपाध्यक्ष, रोहिदास समाज पंचायत संघ रवि पेवेकर-संघ विश्वस्त तसेच गोविंद देवरुखकर- चिटणीस, मनोज सावर्डेकर-, रेश्मा शिर्के सह अदी मान्यवरांचे उपस्थित ही जयंती उत्सवात पार पडली. ह्या सोहळ्यास विविध उपक्रम राबविण्यात आले व मान्यवरांचे मार्गदर्शन देखील झाले. मोठ्या संख्येत समाजातील लोकं उपस्थित राहून शोभा वाढली.

# 350 उभयवंतांच्या हस्ते सामूहिक महाआरती व सेवा गौरव पुरस्कार देवून शिवजन्मोत्सव

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्रातील छत्रपती शिवाजी महाराज यांचे दुसरे मंदिर असलेल्या शिवतीर्थ जलकीबाजार येथील शिव जन्मोत्सवाकडे सपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागून असते, दरवर्षी प्रमाणे याही वर्षी मोठ्या जल्लोषात, शिव जन्मोत्सवचे नियोजन करण्यात आले होते. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या 350 व्या राज्यभिषेक पर्वकाळाचे औचित्य लक्ष्यात घेवून 350 उभयवंताच्या हस्ते सामूहिक महा आरती ने उत्सवास सुरुवात झाली,त्याच बरोबर दरवर्षी प्रमाणे समाजात उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या व्यक्तिमतत्वाचा छत्रपती सेवा गौरव पुरस्कार देवून सन्मान करण्यात आला. यामध्ये डॉ.अभिलाष अनिल गोलचा,डॉ.पांडुरंग जगन्नाथ चौधरी, डॉ.विशाल कौतिकराव काळे यांना छत्रपती वैधकिय सेवा गौरव पुरस्कार, श्रीधर एकनाथ काळे, राजू हरिभाऊ वडनेरे,गोकुळ गणपतराव सपकाळ,हारून शब्बीर तडवी यांना छत्रपती युवा गौरव पुरस्कार,नितीन दिगंबर देशमुख,विजय नाटूबा झोंड यांना छत्रपती विद्युत सेवा गौरव पुरस्कार, प्रा.डॉ. ज्ञानेश्वर बाबुराव शेजुल यांना छत्रपती शिक्षणसेवा गौरव पुरस्कार, गणेश मुरलीधर काळे,,चंदन रवींद्र गुप्ता डॉ. अविनाश गुलाबजीजोशी यांना छत्रपती उद्योग सेवा गौरव पुरस्कार, उपसंपादक दैनिक केसरीचे गोकुळसिंग राजपूत सावळदबारा यांनी पत्रकारिता सेवा गौरव पुरस्कार श्री म्हणत कृष्णगिरिजी महाराज यांच्या हस्ते व डॉ निलेश मिरकर, डॉ. शेखर दौड यांच्या उपस्थितीत देवून गौरविण्यात आले. याच बरोबर मंदिर समितीचे माध्यमातून आध्यात्ममिक जागरूकता बरोबर छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार तळागाळातील प्रतेक घटका पर्यंत पोहचविण्यासाठी हभप सौ. संगीताताई व्यवहारे यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते.

# ब्रिलियंट इंग्लिश स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे

## राजं आलं, राजं आलं हे गाणे ठरले आकर्षणाचा केंद्रबिंदू

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** आदर्श शिक्षण संस्थेच्या ब्रिलियंट इंग्लिश मिडीयम स्कूल अ‍ॅन्ड ज्युनिअर कॉलेज खंडाळा बावडाच्या विद्यार्थ्यांचा वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम हा मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी रायगड जिल्हा परिषद रायगड तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे, ट्वेल्थ जॉईन्ट सिव्हिल जज्ज ज्युनिअर डिव्हिजन अ‍ॅन्ड ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट फस्ट क्लास साताराचे सुमेध भिंगारदेव, जॉईन्ट सिव्हिल जज्ज ज्युनिअर डिव्हिजन अ‍ॅन्ड ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट फस्ट क्लास खंडाळाचे करुणा भिंगारदेव, सहाय्यक पोलीस निरीक्षक क्राईम ब्रॅच पुणेच्या अनुराधा गौतम भोसले-वाल्हे, संस्थेचे अध्यक्ष गौतम शंकरराव भोसले, सचिव स्नेहल जयकुमार खरात, बिद्री कॉलेज कोल्हापूरचे प्रा.डॉ.सतिश गंगावणे, संचालक चेतन गौतम भोसले, नाबार्ड





रिटायर्ड मॅनेजर संकपाळ, एल.आय.सी. डेप्यूटी मॅनेजर फाळके आदी मान्यवर उपस्थित होते. संस्थेचे उपाध्यक्ष जयकुमार खरात यांनी संस्थेच्या कार्याची तसेच ब्रिलियंट इंग्लिश मिडीयम स्कूल अ‍ॅन्ड ज्युनिअर कॉलेज खंडाळा बावडाची आजपर्यंत झालेली प्रगती याबद्दल माहिती सांगितली. तसेच खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम, शैक्षणिक सहली, माता पालकांसाठी विविध स्पर्धा, महिला बचत गट यामधून शिक्षक आणि पालकांचे ऋणानुबंध वाढण्यासाठी मदत झाली असल्याचे जयकुमार खरात यांनी म्हटले. संस्थेने विद्यार्थ्यांसाठी आणि त्याच्या बौद्धिक विकासासाठी वेळोवेळी मंथन करून लिड हा अत्याधुनिक अभ्यासक्रम निवडल्याने बौद्धिक विकासासाठी मदतच झाली आहे. चित्रकला, खेळ, वक्तृत्व,थाली डेकोरेशन, सायन्स एक्झिबिशन, हिस्टॉरीकल इव्हेण्टस्, फूड फेस्टिवल सारखे विविध उपक्रम राबविले जात असल्याने विद्यार्थी, पालक, शिक्षक यांचे नाते घट्ट होण्यास मदतच होते आहे, असे सुद्धा जयकुमार खरात यांनी सांगितले. या वार्षिक स्नेहसंमेलनातून विद्यार्थ्यांनी विविध गाण्यावर नृत्य सादरीकरण केले. या वेळी विद्यार्थ्यानी सादर केलेल्या कलेला मान्यवरांसह उपस्थित असलेल्या पालकांनी सुद्धा टाळ्यांच्या कडकडाटात विशेष दाद दिली. स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावर आधारित घेण्यात आलेले राजं आलं, राजं आलं हे गाणं विशेष आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरले. या गाण्यात छत्रपती शिवाजी महाराज यांची भूमिका साकारणारे शाळेतील शिक्षक अक्षय पवार यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या वेशभूषेमध्ये घोड्यावर प्रवेश केल्याने.उपस्थित असलेले सर्वजण उभे राहिले.सर्वांनी छत्रपती शिवाजी राजेंना मानाचा मुजरा करून मानवंदना दिली. प्राचार्या सुदर्शना जाधव,प्रा.निता गोरक्ष जगताप, केमिकल इंजिनिअर एनप्रो पुणेचे साक्षी गौरव खरात, उपमुख्याध्यापिका स्वाती ढमाळ महाराजांचे औक्षण केले. सुत्रसंचलन विशाल रेळेकर, संध्या मछिंद्र -मोरे व माधुरी बडदे यांनी केले तर आभार समित जाधव यांनी केले. कार्यक्रमाचे नेटके आयोजन आणि नियोजन संस्थेच्या सचिव स्नेहल खरात, गौरव खरात, चेतन भोसले यांनी केले.

## भाजपा महिला मोर्चाच्या शहराध्यक्षपदी म्हसाळ

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव (जा) :** दि.२५भाजपाच्या सक्रिय कार्यकर्त्या सौ.सुनिता म्हसाळ यांची भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या शहर अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. सौ सुनीता म्हसाळ यांचे सामाजिक व राजकीय कार्य बघता त्यांची नियुक्ती करण्यात आली.आ.डॉ. संजय कुटे यांनी सुनीता म्हसाळ यांना दि. २३ फेब्रुवारी रोजी नियुक्तीपत्र प्रदान केले. ह्यावेळी सौ. अपर्णाताई कुटे, सौ.लताताई तायडे, सौ. योगिताताई टापरे, सौ. चंदाताई पुंडे, सौ. सुचिता उमाळे, सौ.रुपाली काळपांडे सौ. आरती पलन यांनी अभिनंदन केले. शहर महिला मोर्चा अध्यक्षपदी नियुक्ती झाल्याने शहरातील भाजपाचे संघठन अधिक बळकट करण्यास मदत होईल, असा विश्वास ह्यावेळी आ.डॉ. संजय कुटे आणि भाजपा जिल्हाध्यक्ष सचिन देशमुख यांनी व्यक्त केला.



## वाळूज महानगर अध्यक्षपदी दत्ता पवार

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजी नगर :** लोकस्वराज्य आंदोलन या सामाजिक संघटनेची बैठक बजाजनगर वाळूज येथील लोकशाहीर अण्णा भाऊ साठे सभागृहात पार पडली. या बैठकीत संघटनात्मक बांधणी, येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत मातंग समाजाची भूमिका काय या विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीत वाळूज महानगर अध्यक्षपदी दत्ता पवार, सचिवपदी परमेश्वर मोरे तर बजाजनगर अध्यक्ष पदी माधव नामेवार, गंगापूर अध्यक्ष पदी प्रकाश ननुरे यांची निवड करण्यात आली. या बैठकीमध्ये जिल्हाध्यक्ष अतुल खंडगावकर यांनी प्रास्ताविक केले. संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष प्रा. बी.आर. पारसकर यांनी कार्यकर्त्यांना निवडीचे नियक्तीपत्र दिले. या बैठकीला जेजेराव मोरे, रणजित गायकवाड, निवृत्ती गायकवाड, नामदेव गागलवाड, अमोल बैलकवाड, हनुमंत नामाकार, परमेश्वर मोरे आदींची उपस्थिती होती.



## विधी सेवा महाशिबिराचे आज आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण नवी दिल्ली, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार तसेच प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या अध्यक्षा समृद्धी भीष्म यांच्या मार्गदर्शनात जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, चंद्रपूर व तालुका विधी सेवा समिती, गोंडपिपरी यांच्या संयुक्त विद्यमाने विधी सेवा महाशिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार, दि. 28 फेब्रुवारी 2024 रोजी सकाळी 10.30 वाजता दलित मित्र वि.तु.नागापुरे डी.एड कॉलेज, गोंडपिपरी येथे विधी सेवा महाशिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या महाशिबिरात जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत मोफत विधी सल्ला व सहाय्य दिल्या जाणार असून सर्व शासकीय आणि निमशासकीय योजनांचे लाभ व त्यांची माहिती देण्यात येणार आहे. महाशिबिराचे उद्घाटन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या अध्यक्षा समृद्धी एस. भीष्म यांच्या हस्ते होणार असून जिल्हाधिकारी विनय गौडा, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे. तरी, सर्वांनी महाशिबिरास भेट देवून विविध योजनांची माहिती व लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव सुमित जोशी यांनी केले.



पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे, आकुर्डी, जि.पुणे येथील प्रा. रामकृष्ण मोरे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोहर चासकर यांची स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे कुलगुरूपदी नियुक्ती झाल्याबद्दल पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या वतीने व पिरंगुट येथील अनंतराव पवार महाविद्यालयातर्फे जाहीर सत्कार करन्यात आला यावेळी व्यासपीठावर संस्थेचे विद्यमान अध्यक्ष नामदार अजितदादा पवार, उपाध्यक्ष राजेंद्र घाडगे, मानद सचिव ॲड. संदीप कदम, उपसचिव, एक. एम. पवार, खजिनदार ॲड. मोहनराव देशमुख, सहसचिव (प्रशासन) ए.एम. जाधव आदी संस्था पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अभय खंडागळे व डॉ.अभय पाटील, शिक्षकेतर कर्मचारी रवी लाड, नितीन शिंदे हे उपस्थित होते.

## स्टेट अकॉउंट एम्प्लॉईजच्या मैत्री मेळाव्यातून बांधली एकजुटीची मूठ

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** येथिल रायगड फंक्शन हॉल येथे दि. (25)रविवार रोजी स्टेट अकॉउंट एम्प्लॉईज असोसिएशन च्या वतीने आयोजित मैत्री मेळावा अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाला. या मैत्री मेळाव्यातून स्टेट अकॉउंट एम्प्लॉईज असोसिएशन व विज तांत्रिक कामगार संघटना 1701 यांनी भविष्यात आपापल्या सभासदांच्या मागण्यासाठी एकत्र येऊन काम करण्यासाठी मैत्रीपूर्ण संबंध निर्माण व्हावे यासाठी हा मेळावा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक SAEA चे अध्यक्ष अब्दुल्ला देशमुख यांनी केले आपल्या भाषणात भविष्यात लेखा कर्मचाऱ्यांच्या न्याय मागण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगून लेखा कर्मचाऱ्यांनी आत्ता आपली एकजूट दाखवून दिली पाहिजे असे नमूद केले.तसेच प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले हाजी सय्यद जहीरोद्दीन यांनी SAEA व विज तांत्रिक कामगार संघटना 1701 या दोन्ही संघटना वेगवेगळ्या कॅडर च्या संघटना जरी असल्या तरी भविष्यात आपण एकजुटीने काम केले पाहिजे व यासाठी विज तांत्रिक कामगार संघटना 1701 ही संघटना लेखा कर्मचाऱ्यांच्या पाठीशी भक्कम पणे उभी असून एकमेकांचा मान ठेवून आपण स्थानिक पातळीपासून ते वरिष्ठ पातळीवर प्रश्न मांडून ते सोडवण्यासाठी हवे ते सहकार्य करण्याची ग्वाही दिली. तसेच पगारवाढीवर होत असलेल्या चर्चेचा संक्षिप्त आढावा सांगितला. तूम्ही आमच्या सभासदांच्या अडचणीत सहकार्य करावे



आम्ही आपल्या अडचणीत मदत करू आणि मिळून पुढे जाऊ असे मत वयक्त केले

माळी साहेब,विज तांत्रिक कामगार संघटना 1701 संघटनेचे शेंडगे साहेब यांनी आपापले मनोगत व्यक्त केले.SAEA चे केंद्रीय सरचिटणीस यांनी आपले मनोगत व्यक्त करताना लेखा कर्मचाऱ्यांसाठी पगार वाढ प्रस्ताव कशा पद्धतीने मांडला असून भविष्यात त्यासाठी आपण वेगवेगळ्या माध्यमातून प्रयत्न करणार असल्याचे सांगून SAEA व विज तांत्रिक कामगार संघटना 1701 ह्या दोन वेगवेगळ्या कॅडर च्या संघटना जरी असल्या तरी एकमेकांना सहकार्य करून आपल्या सभासदांच्या अडचणी व मागण्या सोडवण्यासाठी प्रयत्न करू असे सांगितले.

लेखा कर्मचारी यांच्यासाठी चर्चा सत्र आयोजित करण्यात आले होते व वेगवेगळ्या भागातून आलेल्या लेखा कर्मचारी यांनी आपापली मते मांडली. व पुढील वाटचालीची दिशा ठरवून महावितरण मधील लेखा कर्मचारी कसा बळकट करता येईल यासाठी हवे असलेले सर्व प्रयत्न SAEA च्या माध्यमातून करण्याचे ठरले. सर्वांच्या प्रश्नांना SAEA चे अध्यक्ष व सरचिटणीस यांनी उत्तर देऊन महावितरण मधील लेखा कर्मचारी बळकट करण्यासाठी SAEA ला साथ देण्याचे आव्हान केले. या चर्चासत्रात SAEA केंद्रीय उपाध्यक्ष श्री कपिल बोर्डे, केंद्रीय कार्याध्यक्ष मिलिंद घायवत, तसेच सहसचिव संतोष वाघमारे, महिला प्रतिनिधी सोनल गायकवाड, अस्मिता जाधव यांनी आपापली मते मांडून लेखा कर्मचाऱ्यांना येणाऱ्या अडचणीत आपण सर्वांनी एकजुटीने उभं राहण्याचे आव्हान केले.SAEA व विज तांत्रिक कामगार संघटना 1701 यांनी मिळून एकमेकांना सहकार्य करून पुढील वाटचाल करण्याचे ठरवले असल्याने लेखा कर्मचारी यांच्या मनात वेगवेगळे प्रश्न निर्माण होत असल्याचे निदर्शनास येत आहेत परंतु लेखा कर्मचारी यांनी आपल्या मनात कुठलाही संभ्रम निर्माण होऊ न देण्याचे आव्हान SAEA तर्फे करण्यात येत असून दोन्ही संघटनेच्या पुढील वाटचाल कशी असेल कोणकोणते वादाचे मुद्दे निर्माण होऊ शकतात यावर कसा तोडगा काढायचा या साठी एक कमिटी स्थापना करण्यात येईल व एक आदर्श आचारसंहिता तयार करून दोन्ही संघटनेच्या सभासदांचा मानसन्मान कसा वाढवता येईल या साठी प्रामाणिक प्रयत्न दोन्ही संघटना करणार आहेत.

या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून SAEA चे केंद्रीय सरचिटणीस सचिन गायकवाड व प्रमुख पाहुणे म्हणून विज तांत्रिक कामगार संघटना 1701 चे केंद्रीय सरचिटणीस हाजी सय्यद जहीरोद्दीन व धाराशिव विभागीय कार्यालयाचे उपव्यवस्थापक नामदेव माळी ,तुळजापूर विभागीय कार्यालयाचे उपव्यवस्थापक दिलीप अकोसकर हे उपस्थित होते. SAEA ने आयोजित केलेल्या हा मैत्री मेळावा यशस्वी व्हावा या साठी केंद्रीय कार्यकारणी सदस्य उंबरे आप्पा, हिरालाल गिरी,इम्रान शेख,बाळासाहेब खोसे,केंद्रीय प्रसिद्धीप्रमुख अमोल माळी साहेब,सतीश अंकुश यांनी विशेष प्रयत्न केले तसेच कार्यक्रमाचे यशस्वी सूत्रसंचालन हे सुदेश माळाले यांनी केले,तर संघटनेचे कोषाध्यक्ष आरेफ मुलाणी यांनी आभार प्रदर्शन करून पुढील वाटचालीत SAEA च्या सोबत खंबीर पणे सर्वांनी उभा राहण्याचे आव्हान केले.

## श्रीक्षेत्र सावळेद्वार येथे चक्रधर स्वामी यात्रा उत्साहात संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील परब्रम्ह परमेश्वर अवतार भगवान श्री चक्रधर स्वामीची भव्य यात्रा मोठ्या उत्साहात संपन्न. लाखो भाविक भक्तांनी ,संत महंत यांनी सावळेद्वारला लावली हजेरी सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांची माहिती सावळेद्वार येथे भगवान श्रीचक्रधर स्वामीचे एकवीस दिवस व्यासत्व होते या यात्रेला विदर्भ- मराठ्याडयासह राज्यातील भाविकांचे श्रद्धास्थान सावळेद्वार व जाळीचा देव येथील यात्रा महोत्सवाला गुरुवारपासून थाटात प्रारंभ झाला होता.यात्रे निमित्ताने चक्रधर स्वामी संस्थानचा परिसर भाविकांच्या गर्दीने फुलून गेला होता.श्री क्षेत्र जाळीचा देव व सावळेद्वार येथील यात्रा महोत्सवाला दरवर्षी राज्यभरातून मोठ्या संख्येने भाविक हजेरी



लावतात. श्री चक्रधर स्वामींच्या भक्ताची, अनुयायांची संख्या मोठी आहे. त्यामुळे यात्रे दरम्यान भाविक भक्त जाळीचा देव येथे येऊन स्वामींचे दर्शन घेतात. भक्तीभावाने पूजा, प्रार्थना करतात. आणि जाळीच्या देवा येथून डोंगळ्याच्या ८५० पायऱ्या उतरून सावळेद्वारला येतात.पायी येत असताना डोंगराच्या पायथ्याशी पांदन रस्तावर अन्नदातांनी भाविक भक्तांतासाठी अन्नदान, पाणी यांची मोठी व्यवस्था करण्यात आली होती. यात्रेसाठी संस्थानच्या आजूबाजूचा परिसर स्वच्छ करण्यात आला होता. भाविकांची गैरसोय होणार नाही, याची काळजी घेण्यात आली होती. भाविकांच्या सोयीसाठी व्यवस्था करण्यात आली अशीही माहिती अरुण पुजारी यांनी जेष्ठ पत्रकार तथा उपसंपादक गोकुळसिंग राजपूत यांच्याशी बोलताना सांगितले आहे. श्रीक्षेत्र जाळीचा देव येथील चक्रधर स्वामी संस्थानचा परिसर निसर्गरम्य वातावरणात आहे. खोल डोंगरदऱ्या भाविकांचे लक्ष वेधून घेतात. डोंगरद-यातून येणारी खेळती हवा मन प्रसन्न करणारी असते.श्रीक्षेत्र जाळीचा देव जालना व बुलडाणा जिल्ह्याच्या सिमेवर वसलेले आहे. तर सावळेद्वार छत्रपती संभाजीनगर, जळगाव व बुलढाणा सिमेवर वसलेले आहे. त्यामुळे छत्रपती संभाजीनगर, जालना व बुलडाणा जिल्ह्यातील भाविकांना यात्रेचे विशेष आकर्षण आहे. आजूबाजूच्या खेड्यातील भाविक दररोज यात्रेत हजेरी लावतात. श्री चक्रधर स्वामींचे दर्शन घेण्यासोबत यात्रेचा मनसोक्त आनंद घेतात. भाविकांच्या गर्दीने जाळीचा देव येथील परिसर फुलुन जातो. जिकडे पाहावे तिकडे भाविकांचा मेळा दिसून येतो. बच्चे कंपनीसह घरातील ज्येष्ठ सदस्यही यात्रेला हजेरी लावतात. भाविकांच्या सोयीसाठी छत्रपती संभाजीनगर, जळगाव, मुक्ताईनगर, जामनेर, पाचोरा, सिल्लोड, जालना, सोयगाव, बुलडाणासह इतर आगारातून एसटी बस सोडण्यात येतात. मोठ्या आनंदात भाविक भक्तांनी लाखोंच्या संख्येने येऊन दर्शनाचा महाप्रसादाचा लाभ घेतला असून यात्रेत कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये यासाठी फर्दापूर पोलिस निरीक्षक प्रफुल्ल साबळे, पोलिस उपनिरीक्षक सुग्रीव चाठे यांच्या मार्गदर्शनाखाली बिट जमादार मिरखॉ तडवी, प्रकाश कोळी, भरत कोळी व होमगार्ड यांनी बंदोबस्त ठेवला.

## वैजापुरकरांना मिळणार तीन दिवसआड पाणी; नगरपरिषदचे पाणी बचतीचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** नगरपलिकेचे घोयेगाव (ता. कोपरगाव) येथील पाणी पुरवठा साठवण तलावात अत्यल्प पाणी साठा आहे. त्यामुळे २७ फेब्रुवारीपासून शहराला तीन दिवसाआड पाणी पुरवठा करण्याचे नवीन वेळापत्रक जारी केले आहे. या पुर्वी दोन दिवसाआड पाणीपुरवठा केला जात होता. नवीन वेळा पत्रकानुसार नगर पालिका रहिवासी क्षेत्रातील नागरिकांना येणाऱ्या चार महिने पाणीपुरवठा विभागाकडून उपलब्ध होणारे पाणी जपून वापरण्याचे नियोजन करावे लागणार आहे. चालू वर्षात कमी पाऊसमानामुळे नाशिक जिल्ह्यात निर्माण झालेल्या पाणी संकटाची झळ वैजापूर शहराला सोसावी लागणार आहे. नशिक पाटबंधारे विभागाकडून नगरपलिकेला करारनुसार बिगर सिंचनासाठी दरमहा मासिक पाणी आवर्तन दिले जाते.उन्हाची वाढती तीव्रतेने पाण्याचे बाष्पी भवन होत असल्याने घोयेगाव येथील चार साठवण तलावात १५ एप्रिल पर्यत पाणी साठा शिल्लक असल्याने शहरात पाणी टंचाईचे संकट निर्माण झाले आहे. शहरवासियांची तहान भागविण्यासाठी नगर पलिकेने साठवण तलावातील पाणी साठयाचा काटकसरीने वापर करण्यासाठी नियोजन केले आहे.

नगरपलिकेचे घोयेगाव येथे एकूण १५ कोटी लिटर क्षमतेचे चार साठवण तलाव आहेत. या तलावात १५ एप्रिलपर्यत शहराला पुरेल इतका पाणीसाठा शिल्लक आहे. ५० हजार लोकसंख्येच्या शहरात पाणी पुरवठा करण्यासाठी दोन स्त्रोत आहेत.त्यापैकी नारंगी मध्यम प्रकल्प हा स्त्रोत पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. या वर्षात पावसाच्या अवकृपेमुळे हा प्रकल्प कोरडाठाक पडला आहे. त्यामुळे नाशिक पाटबंधारे विभागाचे दारणा समुहातून गोदावरी डावा तट कालव्यातून ६० दिवसाला १६८.६२ मि.लि. पाणी साठ्यावर शहरातील पाणीपुरवठयाची भिस्त आहे. चिमटे घोयगाव येथे नगरपलिकेचे १५ कोटी लिटर क्षमतेचे चार साठवण तलाव आहेत.त्या साठवण तलावात पाईपलाईनद्वारे पाणी आणले जाते जल शुद्धिकरण केंद्रात प्रक्रिया करुन नळाद्वारे पुरवठा केला जातो असे पाणीपुरवठा विभागाचे अभियंता सुरेश चिमटे यांनी सांगितले. पाऊस कमी प्रमाणात झाल्यामुळे पाणी टंचाईच्या निर्माण झालेल्या संकटाचा सामना करण्यासाठी नागरिकांनी पाण्याची काटकसर करावी, असे आवाहन नगरपलिकेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी बी. यु. बिघोत यांनी केले आहे.





# सोबलगाव फाट्यावर चक्काजाम

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** मनोज जरांगे यांच्या पाठिंबासाठी व आरक्षणाच्या मागण्यासाठी रविवारी (ता:२५) सकाळी अनेक गावांच्या मराठा समाज बांधवांनी अर्धा तास फुलंब्री-बाजार सावंगी-कन्नड व पिशोर या दुहेरी मार्गावरील सोबलगाव फाट्यावर चक्काजाम आंदोलन केले. एक किलोमीटर अंतरापर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या त्यात कन्नड-फुलंब्री बस देखील होती. बाजार सावंगी सोगलगाव शेखपुर रेल दरेगाव पाडळी झरी वडगाव येथील मराठा समाज बांधव सहभागी होते. येथील पोलीस चौकी त शनिवारी रीतसर निवेदन देण्यात आल्याने पोलीस निरीक्षक धनंजय फराटे यांच्या मार्गदर्शनाखाली जमादार विनोद बिघोत दिलीप बनसोड संतोष भालेराव यांनी बंदोबस्त ठेवला व आपल्या मागण्यांचे निवेदन द्या ते आम्ही खुलताबाद तहसीलदार यांच्याकडे पोहोचते करतो आपण बंद मागे घ्यावा वाटाघाटीनुसार अर्ध्या तासात आंदोलकांनी मोकळी केले.

# वाळू डेपोवर ठेकेदार सक्रिय, जेसीबीने वाळू उपसा सुरू, महसूल विभाग निष्क्रिय !

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**फुलंब्री :** गेवराई गुंगी येथील शासकीस वाळू विक्री केंद्र चालक गिरीजा नदीतून दररोज हजारो ब्रास वाळू उपसा करुन शासनाची खुलेआम फसवणूक करत आहे. याकडे महसुली विभागाने लक्ष केंद्रित करुन संबंधीत निल्स कन्ट्रक्शनविरुद्ध कारवाई करण्यात यावी अशी मागणी होत आहे. गेवराई गुंगी येथे निलेश कडूबा चव्हाण यांनी शासकीय वाळू विक्री केंद्र सुरू केलेले आहे. याकरीता त्यांच्या निल्स कन्ट्रक्शनने ई-निविदा लिलावद्वारे निमखेडा जवळील गिरीजा नदीतील वाळूघाटाचा ठेका घेतलेला आहे. महा-ई- सेवा केंद्रात नोंदणी करणाऱ्याना वाळू देण्याचा शासनाचा नियम आहे मात्र या ठिकाणाहुन



सर्रास वाळू विक्रीचा व्यवसाय सुरू आहे. येत्या जुनपर्यंत एकूण ६००० ब्रास वाळू उपसा करण्याचा ठेका सदर कन्ट्रक्शने घेतलेला आहे. परंतू दररोज पाच हायवा व चार ते पाच ट्रॅक्टरने वाळू उपसा करण्यात येत आहे. प्रत्येक वाहनांच्या पाच ते सहा खेपा म्हणजे दररोज शंभर ते दीडशे ब्रास वाळू उपसा या ठिकाणाहून करण्यात येतो. या ठेकेदारास सकाळी सहा ते सायंकाळी सहा असे वेळेचे बंधून ठरवून देण्यात आलेले आहे परंतू पाळण्यात येत नाही. देखरेख करण्याची तसदी महसुली विभागाचे अधिकारी जाणीवपूर्वक घेत नाहीत. दहा ते बारा फुट खोल खड्डे निमखेडा गिरजा नदीपात्र केवळ चार फुटापर्यंत खोदण्याची परवानगी शासनाने दिली आहे, मात्र संबंधित निल्स कंट्रक्शनने सुमारे दहा ते बारा फुट खोल खड्डे खोदत वाळू उपशाचा सपाटा लावला आहे. सर्व प्रक्रिया ऑनलाईन असताना ठेकेदार मात्र शासनाला लुबाडत आहे. याकडे स्थानिक महसूल विभाग ही जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे. स्थानिक ग्रामपंचायत विरोध करत होती पण उपयोग झाला नाही.

# वीर जवान निखिल घुगे अनंतात विलीन

## हजारोंच्या संख्येने साश्रू नयनाने अखेरचा निरोप

आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड विनोद पाटील**

**बोडखे :** तालुक्यातील वाडीवाकद गावचे सुपुत्र निखिल मोतीराम घुगे वय ३२ यांना आज २६ फेब्रुवारी रोजी अंतिम निरोप देण्यात आला. निखिल घुगे हे राजस्थानमधील जोधपूर येथे कर्तव्यावर होते. २४ फेब्रुवारी रोजी हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचा मृत्यू झाला. हे वृत्त जिल्ह्यात पसरताच सर्वत्र शोककळा पसरली असून आज २६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ वाजता त्यांचे पार्थिव रिसोड तालुक्यातील वाकद येथील शिवाजी विद्यालयात आणण्यात आले. यावेळी मोठी गर्दी जमली होती. येथून त्यांचे पार्थिव त्यांच्या मूळ गावी नेत वाडीवाकद येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. या अंत्यसंस्कारात रिसोड पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि कर्मचारी सहभागी झाले होते. शूर सैनिक निखिल यांना शेकडो नागरिकांनी साश्रू नयनाने अखेरचा निरोप दिला. निखिल घुगे २०११ मध्ये सैन्यात दाखल झाले होते. त्यांचे लष्करी प्रशिक्षण नाशिकमध्ये पूर्ण झाले. तेथून त्यांची पोस्टिंग बिकानेरमध्ये झाली. त्यानंतर त्यांची पोस्टिंग नालंदा, जम्मू-काश्मीरमध्ये झाली. त्यानंतर निखिल यांचे प्रमोशन होऊन राजस्थानमधील जोधपूर येथे बदली झाली. निखिल हे अत्यंत गरीब कुटुंबातील असून त्याचे आई-वडील त्यांच्या अडीच एकर जमिनीवर शेती करून उदरनिर्वाह करतात.

निखिल गावात खूप लोकप्रिय होते. ते नेहमी गावातील तरुणांना सैनिक सेवेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन, मार्गदर्शनही करीत होते. निखिल यांची पत्नी वाडीवाकद गावच्या सरपंच आहेत. आपल्या मेहनतीमुळे आणि समर्पणामुळे निखिलने सैन्यात भरती होण्यापर्यंत मजल मारली होती. पण नियतीच्या मनात काही वेगळेच होते. वयाच्या ३२ व्या वर्षी त्यांचे आकस्मिक निधन ही गावकऱ्यांसाठी अत्यंत दुःखद घटना मानली जात आहे. निखिलच्या अंत्ययात्रेत ग्रामस्थांसह, माजी सैनिक, राजकीय, सामाजिक क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सैनिकांकडून सलामी देण्यात आली व त्यांच्या पार्थिवर चक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहण्यात आली यावेळी जिल्हा प्रशासनाकडून निवासी उपजिल्हाधिकारी घुगे, आमदार अमित झनक, तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर,ठाणेदार भूषण गावंडे आदींनी पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. वीर जवान निखिल घुगे यांच्या मागे आई-वडील भाऊ सह पत्नी व एक तीन वर्षीय मुलगा असा आप्त परिवार आहे.



# स्वयंसेवकांनी उचलला सुमारे ४ टन कचरा

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**छत्रपती संभाजीनगर :** शाखा सिडको, छत्रपती संभाजीनगर तसेच वाळूज तर्फे हर्सुल तलाव व कायगाव टोका नदीच्या किनाऱ्याची स्वच्छता या अभियानांतर्गत करण्यात आली यावेळी दोन्ही ठिकाणी 700 महिला व पुरुष स्वयंसेवक यांनी सुमारे 4 टन कचरा ज्यामध्ये मुख्यत्वे प्लास्टिकच्या पिशव्या, कपडे, बॅनर, इत्यादी जमा करून महानगरपालिके कडे सुपूर्त केला. यावेळी मंडळाचे कन्हैय्यालाल डेब्रा, डी. जी. दळवी, शिवाजी कुबडे, विजय बोडखे यांची उपस्थिती होती.

संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या विद्यमाने बाबा हरदेवसिंहजी यांच्या विपुल शिकवणूकीतून प्रेरणा घेत या "प्रोजेक्ट अमृत"चे आयोजन करण्यात आले. यावर्षी 'आओ संवारे, यमुना किनारे' (चला सावरू यमुनेचे तीर) या मुलभूत संदेशातून या परियोजनेने एक जनजागृतीचे रूप धारण केले. या प्रसंगी संत निरंकारी मिशनचे समस्त अधिकारीगण मान्यवर अतिथि तसेच हजारोंच्या संख्येने स्वयंसेवक व सेवादलचे सदस्य सहभागी झाले. कार्यक्रमाचे थेट प्रसारण संत निरंकारी मिशन की वेबसाईटवर करण्यात आले ज्याचा लाभ देश-विदेशातील भाविक भक्तगणांनी घेतला. या कार्यक्रमात दिल्ली विश्वविद्यालयातील हजारो विद्यार्थी व शिक्षक यांच्यासह अनेक संस्थांचे प्रतिनिधी व पर्यावरण संरक्षणाशी संबंधित अनेक मान्यवर अतिथींनी भाग घेतला. एफ एम रेडिओ चॅनल 92.7-बिग तसेच भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाचे प्रतिनिधिही या कार्यक्रमात सहभागी झाले. कार्यक्रमाचे समापन झाल्यानंतर सहभागी झालेल्या अतिथीगणांनी मिशनची अत्यधिक प्रशंसा केली आणि निरंकारी सद्गुरु माता सुदीक्षाजी यांचे हृदयापासून आभार व्यक्त करुन सांगितले, की या कल्याणकारी योजनेच्या माध्यमातून मिशनने जल संरक्षण व जल स्वच्छतेच्या दिशेने, प्रकृती रक्षणार्थ निश्चितपणे एक महत्वपूर्ण पाऊल उचलले आहे.



# सेवा गौरव कार्यक्रम व निरोप समारंभ संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**पीरबावडा :** येथील न्यू हायस्कूल शाळेत श्री. ए. के. कोलते सरांचा सेवा गौरव कार्यक्रम झाला यात सरांनी पिरबावडा येथेच शाळेवर त्यांची नोकरी पूर्ण केली त्यांचा सत्कार यावेळी ग्रामस्थ व पंचक्रोशीतील पालक, विद्यार्थी यांच्या हस्ते करण्यात आला यावेळी वर्ग दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला यावेळी शालेय समिती अध्यक्ष जनार्धन काळे, सदस्य वसीम शेख, सरपंच सारंग गाडेकर, माजी सरपंच हिराबाई अजिनाथ मुळे, मुख्याध्यापक डी के काळे, माजी मुख्याध्यापक पंचभय्ये सर, आलिम शहा, कचरू गाडेकर, राजू खैरनार, निवृत्ती काळे, कलिम शेख, गजानन बोकील, नदीम मुलतानी, दिगंबर बोकील, इरफान पठाण शाळेतील शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी पालक व पपंचक्रोशीतील पदाधिकारी यावेळी मोठ्या संखेने उपस्थित होते.



गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# दे. मही सरपंचपदी कमल शिंगणे तर उपसरपंचपदी अतिक मोहमद यांची निवड

## फटाक्यांची आतिषबाजी व गुलालाची उधळण करुण जल्लोष

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** ग्रामपंचायत सरपंच पदाचा वंदना भगवानराव शिंगणे यांनी राजीनामा दिल्यानंतर सिंदखेडराजा मतदार संघाची राजकिय पंढरी म्हणून ओळख असलेल्या देऊळगांवमही ग्रामपंचायत सरपंच पदाची माळ कोणाच्या गळ्यात पडणार याकडे तालुक्यासह संपूर्ण मतदार संघाचे लक्ष लागून होते. देऊळगांवराजा तालुक्यातील सर्वात मोठी १७सदस्यीय ग्रामपंचायत असलेल्या देऊळगांवमही ग्रामपंचायत सरपंच व उपसरपंच पदाची आज दि.२६ फेब्रूवारी रोजी सोमवरला दुपारी २:१३वाजता निवडणूक प्रक्रिया पार पडली.सरपंचपदी कमल उमेश शिंगणे यांची सदस्यीय मतदान प्रकिया घेऊन सरपंच पदी बिनविरोध निवड करण्यात आली. उपसरपंच पदाकरिता ग्राम विकास पॅनलचे संदीप विजय राऊत यांनी अर्ज भरला असता सरपंच पदाकरता दोन अर्ज दाखल झाले होते पण मतदान प्रक्रियेपूर्वीच संदीप राऊत यांनी अर्ज मागे घेत उपसरपंच पदी आतीक मोहम्मद यांची बिनविरोध निवड करण्यात आली यावेळी १७ सदस्यपैकी १४ सदस्य उपस्थित होते. याप्रसंगी माजी अर्थ व बांधकाम सभापती रियाजखाँन पठाण, माजी सभापती भिकाजी सखाराम शिंगणे,जेष्ठ नेते राजूशेट डुंगरवाल, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती समाधान भिकाजी




शिंगणे,अरविंदभैया शिंगणे,बि. एम.पठाण, भास्कर आण्णा शिंगणे,तेजराव शिंगणे,रामभाऊ शिंगणे,नितिन भगवानराव शिंगणे,शेख फरहाद, माजी सरपंच वंदना भगवानराव शिंगणे,मन्नान पठान, रामकिसन म्हस्के, सुभाष वामराव शिंगणे,सुभाशदादा शिंगणे, अंनता इंगळे,वसुदेव पाटील शिंगणे,रतन रेशवाल, ज्ञानेश्वर शिंगणे,नागोराव शिंगणे,शेख.निसार,रविंद्र इंगळे, सुभाष इंगळे,कान्हा शिंगणे,भगवान शिंगणे,अशोक पाबळे, भगवान चंद,सय्यद सईद, संजय माऊली शिंगणे,सुनिल मोरे, संजय खरात,खरात,धर्मराज खिल्लारे, मोहंमद आशिक,भगवान शिंगणे, राजेंद्र शिंगणे,अशोक शिंगणे,प्रकाश शिंगणे, दीपक शिंगणे ,गणेश शिंगणे रमेश शिंगणे असलम खान,शेख. मुस्लिम,शेख. रफीक,ईनुस कारगिल, ग्रामपंचायत सदस्य शिला मधुकर शिंगणे, कैयकई अशोक शिंगणे,सुनिता अंनता इंगळे,शेख.फरजानाबी रब्बानी,वनिता विवेक खिल्लारे, संजय खरात, संदीप राऊत,तुळशीराम पंडित,विलास शिंगणे, दींपू शिंगणे, सुनील शिंगणे, शेख मज्जिद, जाफरखान, जहीर खान,शेख इमरान,शेख उस्मान,शेख बबलू, शेख निसार, शेख वसीम,शेख शगीर,अब्दुल शेख खुद्दुस,शेख इजदान, मोहमद शफीक,रवि मुळे, अशोक शिंगणे, विकास शिंगणे, बालू शिंगणे,यांच्यासह असंख्य कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणुन मंडळ अधिकारी वि. रा.हिवरे,ग्रामविकास अधिकारी,व्ही.पी. चेके, तलाठी संदीप वायाळ,अंनता इंगळे, प्रभाकर झिने,मिलन शेळके, रंगा शिंगणे, दाऊत पठाण, पुष्पा शिंगणे यांनी काम पाहिले. नवनिर्वाचित सरपंच कमल उमेश शिंगणे यावेळी बोलताना म्हणाले की, मला वाढदिवसाच्या दिवशी योगायोगाने सरपंच पदाची माळ गळ्यात घालून ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थांनी एक प्रकारे वाढदिवसाची भेट दिली आहे. ग्रामपंचायत सदस्य व पक्षश्रेष्ठीच्या माध्यमातून गावचा सर्वांगीण विकास करणार असल्याचे यावेळी बोलताना म्हणाल्या.

# विविध मागण्यांसाठी आंदोलन करणार : वाघ

आधुनिक केसरी न्यूज



**खुलताबाद :** तालुक्यातील व शहरातील नागरिकांच्या विविध समस्या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते ठिय्या आंदोलन करणार असल्याचे एक निवेदन तहसीलदार यांना देण्यात आले आहे. खुलताबाद तालुक्यात विविध समस्या निर्माण झालेल्या आहे त्या समस्या चे निराकरण करण्यासाठी त्या अनुषंगाने खुलताबाद तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते वीरेंद्र वाघ तहसील कार्यालय समोर दिनांक 05/03/2024 रोजी ठिय्या आंदोलन करणारआहे. असे लेखी तहसीलदार यांना कळवले आहे. काय आहे मागण्या1 )खुलताबाद तालुक्यातील एन पी एच राशन कार्ड धारकांना स्वस्त धान्य पुरवठा चालू करणे. 2 ) विविध निराधार फाइल्स मंजूर करणे. 3 ) सध्या प्रभारी असलेले ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधीक्षक पद कायमस्वरूपी भरणे. 4 ) ग्रामीण रुग्णालयात 102 रुग्णवाहिकेचा वाहनचालकाचे रिक्त पद भरणे. 5 ) सध्या प्रभारी असणारे गटशिक्षणाधिकारी पद कायमस्वरूपी भरणे.
6 ) तालुक्यातील शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, पदे कायमस्वरूपी भरणे. 7 ) नगरपरिषद अंतर्गत 2016 17 पासून बेघर प्रलंबित प्रस्ताव मंजूर करणे. 8 ) नगरपरिषद येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक ते नगर खांना पर्यंत रोडचे काम सुरू करणे आदि मागण्यांसाठी ठिय्या आंदोलन करणार आहे.

# जल परमात्म्याचे वरदान आहे, त्याचे अमृताप्रमाणे रक्षण करा

## सद्गुरु माता सुदिक्षाजी यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**नेमीनाथ जैन**

**बोरी :** जल परमात्म्याचे वरदान आहे, त्याचे सर्वांनी काटेकोरपणे अमृताप्रमाणे रक्षण करा असे आवाहन सद्गुरु माता सुदिक्षा जी महाराज यांनी केले. रविवारी आयोजित कार्यक्रमात निरंकारी राजपिता रमीतजी यांच्या पावन आशिर्वादाने सकाळी आठ वाजता अमृत प्रोजेक्ट अंतर्गत स्वच्छ जल स्वच्छ मन परियोजनेच्या दुसऱ्या टप्प्याचा शुभारंभ यमुना नदीचा छट घाट आई टी ओ दिल्ली येथून करण्यात आला.
बाबा हरदेव सिंह जी महाराज यांच्या शिकवणीतून प्रेरित अशी ही परियोजना भारताच्या 27 राज्य व केंद्रशासित प्रदेशातील1533 ठिकाणी 11 लाखाहून अधिक स्वयंसेवकाच्या सहभागाद्वारे विशाल रूपात यशस्वीरित्या आयोजन करण्यात आले.
प्रोजेक्ट अमृत अंतर्गत स्वच्छ जल स्वच्छ मन ही परियोजना परभणी जिल्ह्यातील क्षेत्र त्रिधारा येथे मंदिर परिसरातील नदी व परिसर या ठिकाणी राबविण्यात आली. या कार्यक्रमांमध्ये



परभणी जिल्ह्यातील निरंकारी सेवादल संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनचे सदस्य तसेच अन्य निरंकारी भक्तगणांनी मोठ्या संख्येने भाग घेतला. संबंधित सरकारी अधिकारी प्रतिष्ठित नागरिक व जनसामान्याकडून या उपक्रमाचे कौतुक करण्यात आले. सद्गुरु माताजीनी प्रोजेक्ट अमृत याप्रसंगी आपल्या पावन आशीर्वाद वचनामध्ये सांगितले की ,आपल्या जीवनात पाण्याला फार महत्त्व आहे. जल अमृता समान आहे. पाहिजे तेवढ्याच पाण्याचा वापर करणे हे नागरिकाचे कर्तव्य आहे. जवळपास 100 सेवा दल निरंकारी भक्तमंडळी यांनी या स्वच्छता अभियानात सहभाग नोंदविला असल्याचे परभणी जिल्हा संयोजक श्री रमेशजी चव्हाण यांनी सांगितले. श्रीक्षेत्र त्रिधारा देवस्थान ट्रस्टचे कार्यकारिणी सदस्य, सेवा दल महापुरुष, बहेनजी तसेच सेवेत सहभागी झालेल्या सर्वांचे आभार व्यक्त करण्यात आले.

# रब्बी पिकांची प्रचंड हानी; गारपीटसह अवकाळी

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** सोमवारची रात्र जिल्ह्यासाठी प्रामुख्याने रब्बी पिकांसाठी प्रलयकारी ठरली! जोरदार अवकाळी पावसासह गारपिटीने रब्बी पिके, भाजीपाला व फळबागांचे मोठे नुकसान झाले. निसर्गाच्या या प्रकोपातून मुके जीवसुद्धा वाचले नसल्याचे दुर्देवी वृत्त आहे.
जिल्ह्यातील तेराही तालुक्यांत सोमवारी रात्री उशिरा मेघगर्जना, वादळी वाऱ्यासह दमदार पावसाने हजेरी लावली. यापाठोपाठ ठिकठिकाणी गारांचा वर्षाव झाला. बोराच्या आकारापासून मोठ्या आकाराच्या गारांच्या वर्षावाने पिके, भाजीपाला जमीनदोस्त झाला. सोंगलेल्या पिकांची अतोनात हानी झाली. चिखली देऊळगाव राजा मार्गावर निसर्गाचे तांडव पहावयास मिळाले. रात्री सव्वानऊच्या सुमारास गारपिटीला सुरुवात झाली.
हा तडाखा अनेक मिनिटे सुरू असल्याने मार्गावर व आजूबाजूच्या शेतात गारांचा खच पडला. सिंदखेडराजा तालुक्यातील मलकापूर पांगरा, दुसरबीड, लोणारमधील बीबी, किनगाव जट्टू, बीबी, गोवर्धन, देवा नगर या गावात असेच चित्र होते. शेगाव तालुक्यातील भोनगाव येथे अर्धातास गारांचे तांडव चालले. परिणामी रब्बी पिके, भाजीपाला, फळबागांचे नुकसान झाले. यामुळे हजारो शेतकरी हवालदिल झाले आहे. शेतातील गहू हरबरा काढणीला आला होता त्याचे मोठ्या प्रमाणत नुकसान झाले आहे. झाडावर गाढ झोपेत असलेल्या पक्ष्यांनाही गारपीट व अकवाळी पावसाचा फटका बसला. झाडावरून खाली कोसळल्याने अनेक बगळ्यांचा करुण अंत झाला.



# निरेत संत रोहिदास महाराज यांची जयंती साजरी; रथातून मिरवणूक

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** 'मन चंगा तो, कटोती मे गंगा","मानव सेवा हीच ईश्वर सेवा"असे सांगणारे संत शिरोमणी रोहिदास महाराज यांची जयंती राष्ट्रीय चर्मकार महासंघ शाखा निरा यांच्या वतीने निरा, ता.पुरंदर येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी विविध समाज घटकातील मान्यवरांनी हजेरी लावत संत शिरोमणी रोहिदास महाराज यांना अभिवादन केले.निरा शहरातून अगदी शांततेत संत रोहिदास महाराज यांच्या प्रतिमेची रथातून मिरवणूक काढण्यात आली.निरेसह पिंपरे खुर्द,पाडेगाव,निंबुत या भागातील समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामपंचायत निरा येथे संत रोहिदास महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.यावेळी सरपंच तेजश्री काकडे, उपसरपंच राजेश काकडे,दत्तात्रय चव्हाण,मनोज शहा,लक्ष्मण गोपने, रेणुका कोठडीया,वैजयंती शहा, अमोल साबळे आदींसह इतरांकडून संत रोहिदास महाराज यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. तसेच राधाकृष्ण मंगल कार्यालयात संपन्न करण्यात आलेल्या कार्यक्रमातून व्यायाम व आहार विषयी विशेष मार्गदर्शन करण्यात आले. विविध क्षेत्रात विशेष कामगिरी करणारा लोकांना सन्मानित करण्यात आले. पुष्पांजली भोसले, बाळासाहेब भोसले, रूपेश कांबळे, मंगल बबन आगवणे, श्रावणी टिके, ओंकार बागडे,डॉ. शिवाजी डोईफोडे, उज्वला डोईफोडे, संदीप डोईफोडे, मयुरी सोनवणे, भारती सोनवणे आदींचा सत्कार करत गौरव करण्यात आला. यावेळी शहराध्यक्ष चंपकलाल अडसूळ, मयुरी आगवणे, घनश्याम चव्हाण आदींनी मनोगते व्यक्त केली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सूर्यकांत कांबळे, सागर बागडे, दिलीप बागडे, अशोक बागडे, राकेश कांबळे, तेजस कांबळे, दत्ता कांबळे, संजय अडसूळ, मिलिंद



आगवणे, राजू देसाई, गणेश कांबळे, प्रा.राजेंद्र जाधव यांच्यासह अनेक मान्यवरांनी विशेष मेहनत घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वर्षा कांबळे यांनी केले. तसेच प्रास्ताविक उत्तम आगवणे यांनी केले तर शिल्पा अडसूळ व मंगल आगवणे यांनी सर्व उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

# 'सहज सुचले ते..' आणि 'न्यूक्लेर रेडिएशन अँड हेल्थ फिजिक्स' पुस्तकांचे थाटात प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** प्रा. डॉ प्रवीण उगीले यांनी लिहिलेल्या "सहज सुचले ते..." आणि "न्यूक्लेर रेडिएशन अँड हेल्थ फिजिक्स" या मराठी व इंग्रजी दोन पुस्तकांचे प्रकाशन केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ भागवतजी कराड व मा मंत्री अतुलजी सावे यांच्या हस्ते द फर्न रेसिडेन्सी येथे संपन्न झाला यावेळी व्यासपीठावर डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ विजय फुलारी, लेखिका डॉ प्रविणा उगीले, श्री संजय उगीले यांची प्रमुख उपस्थितीत होती.

प्रास्ताविकात डॉ प्रविणा उगीले यांनी "न्यूक्लेर रेडिएशन अँड हेल्थ फिजिक्स" या पुस्तकामध्ये सध्या रेडिएशन च्या माध्यमातून विज्ञाना मध्ये होणारे फायदे व सूक्ष्म उपयोग तसेच पी एच डी च्या विद्यार्थ्यांना हे पुस्तक खूप उपयुक्त ठरणार आहे, डॉ प्रविणा उगीले यांच्या सहज सुचले ते... पुस्तकाचे लेखन सुध्दा सहजच लिहोले गेले आहे यामध्ये लेखिकेने आपल्या जीवनातील काही खास




प्रसंगाचे वर्णन केले आहे व आपल्या आवडी निवडी बद्दल प्रतिक्रिया मांडली आहे

यावेळी डॉ भागवत कराड यांनी पुस्तक प्रकाशन करताना खूप आनंद होत आहे असे मत व्यक्त करत न्युक्लेर रेडिएशन चे वैद्यकीय उपचारात होत असलेले फायदे याबद्दल माहिती देत डॉ प्रविणा उगीले यांनी लिहिलेल्या दोन वेगवेगळ्या संदर्भा च्या पुस्तकांचे कौतुक केले, श्री अतुलजी सावे यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत संजय उगीले यांची पाठ थोपटत डॉ प्रविणा उगीले यांच्या पाठीशी खंबीर पणे उभे राहत त्यांच्या करियर मध्ये दिलेल्या आधाराचा विशेष उल्लेख केला

या कार्यक्रमाचे औचित्य साधत श्री संजय उगीले परिवार तर्फे आयर्न मॅन (लोह पुरुष) म्हणून 'किताब पटकावलेले संभाजीनगर शहरातील वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री संदीप गुरमे यांच्या कार्याची दखल घेत त्यांचा सपत्निक मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रविणा कन्नडकर यांनी तर आभार प्रदर्शन श्री धोंडीराम कासले यांनी केले.



# भेलके महाविद्यालयाचा एन.एस.एस.तर्फे किल्ले राजगड संवर्धन स्तुत्य उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** राजगड किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मराठी राज्याची पहिली राजधानी होती. पुणे शहराच्या नैर्ऋत्येला ४८ कि.मी. अंतरावर आणि पुणे जिल्ह्यातील भोर गावाच्या वायव्येला २४ कि.मी. अंतरावर नीरा-वेळवंडी-कानंदी आणि गुंजवणी या नद्यांच्या खोऱ्यांच्या बेचक्यात मुरुंबदेवाचा डोंगर उभा आहे. या किल्ल्याला २००० वर्षांपासूनचा इतिहास आहे. एवढं अनन्य साधारण महत्त्व असलेल्या महाराजांच्या गडावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व शंकरराव भेलके महाविद्यालय नसरापूर राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने ऐतिहासिक स्थळे दत्तक योजनेअंतर्गत "दोन दिवसीय जिल्हास्तरीय कार्यशाळेचे" आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन संस्थेचे उपसचिव मा. श्री एल एम पवार साहेब व संस्थेचे आजीव सदस्य श्री. मालुसरे प्राचार्य डॉ.तुषार शितोळे, गावाचे सरपंच गुलाबराव रसाळ शाळेचे मुख्याध्यापक श्री कांबळे सर यांनी केले. गड संवर्धन हा खरोखरच एक स्तुत्य उपक्रम आहे. अशाप्रकारच्या उपक्रमांचे आयोजन आज काळाची गरज आहे असे प्रतिपादन मा. एल एम पवार यांनी केले. उद्घाटनानंतर सर्व स्वंयसेवकांनी गडावरील सर्व प्रकारचा प्लास्टिक कचरा गोळा केला. विद्यार्थ्यांना गड स्वच्छतेबरोबरच राजगडाच्या इतिहासाबद्दल दुर्ग अभ्यासक सौरभ गव्हाणे पाटील यांनी विद्यार्थ्यांना सखोल माहिती दिली. पर्यटकांकडून गडाची स्वच्छता व पावित्र्य धोक्यात आले आहे. त्याचे दुष्परिणामही पर्यावरण आणि परिसरातील अनेक पशुपक्षांवर होत आहेत. विद्यार्थ्यांना याची प्रचिती यावी याकरता ही दोन दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत सिंहगड महाविद्यालय लोणावळा, नव सह्याद्री महाविद्यालय , अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालय सासवड, अनंतराव पवार महाविद्यालय पिरंगुट, अमृतेश्वर महाविद्यालय विंझर इ. महाविद्यालयांतून विद्यार्थी आले होते. या कार्यशाळेचे आयोजन प्राचार्य डॉ तुषार शितोळे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा जाधवर दयानंद, कार्यक्रम अधिकारी डॉ जगदीश शेवते, कार्यशाळा समन्वयक डॉ सचिन घाडगे यांनी केले. या कार्यक्रमास महिला कार्यक्रम अधिकारी प्रा ऋतुजा साळुंखे, ग्रंथपाल प्रा.भगवान गावित, प्रा माऊली कोंडे, प्रा महेश कोळपे, ग्रामस्थ आणि विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# महिला मोर्चाच्या विधानसभा अध्यक्षपदी योगिता टापरे यांची नियुक्ती

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव (जामोद) :** दि.२७ भाजपाच्या सक्रिय कार्यकर्त्या तथा शहरातील ज्येष्ठ सामाजिक शैक्षणिक, क्षेत्रातील अग्रगण्य अशा योगितताई तुषार टापरे यांची जळगाव (जामोद) विधानसभा भाजपा महिला मोर्चाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. त्यांना २३ मार्च रोजी आ. डॉ. संजय कुटे यांचे हस्ते नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

त्यांच्या नियुक्तीमुळे जिल्ह्यामध्ये महिला मोर्चाचे संघठन मजबूत होईल असा विश्वास यावेळी आमदार डॉ.कुटे यांनी व्यक्त केला. त्यांच्या नियुक्ती बद्दल भाजपा जिल्हाध्यक्ष सचिन देशमुख,अनिता जयस्वाल,सौ. अपर्णाताई संजय कुटे यांचे सह भाजपा पदाधिकाऱ्यांनी, महिला मोर्चा पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.






# वैदर्भीय आंबेडकरी साहित्य संमेलनाच्या बोधचिन्हाचे अनावरण

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** संग्रामपूर तालुक्यातील वरवट बकाल येथे१६ आणि १७ मार्च रोजी अ. भा. आंबेडकरी साहित्य व संस्कृती संवर्धन महामंडळाचे तिसरे वैदर्भीय आंबेडकरी साहित्य संमेलन सातपुडा प्रतिष्ठान संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात येत आहे. संग्रामपूर तालुक्यात प्रथमच होत असलेल्या वैदर्भीय आंबेडकरी साहित्य संमेलनाच्या बोधचिन्हाचे अनावरण आगळ्यावेगळ्या पद्धतीने आणि शेकडो लोकांच्या उपस्थितीत वरवट बकाल येथील बसस्थानकात करण्यात आले. हे संमेलन म्हणजे वैचारिक जागराची मोठी संधी असल्याची प्रतिक्रिया यावेळी उपस्थितांनी दिली. बोधचिन्हामध्ये विदर्भाचा नकाशा अंकीत असून दीक्षाभूमी आणि लेखनी सुद्धा समाविष्ट करण्यात आली आहे. दीक्षाभूमी ही मूल्यांतराचे आणि नवजागरनाचे प्रतीक आहे त्यामुळे बोधचिन्ह विशेष आकर्षक झाले आहे. सदर बोधचिन्ह बुलढाणा जिल्ह्यातील सुप्रसिद्ध कवी आणि चित्रकार प्रशांत डोंगरदिवे यांनी तयार केले आहे. बोधचिन्ह अनावरण प्रसंगी संमेलनाचे मुख्य संयोजक भाऊ भोजणे,.. अभयसिंह मारोडे ' वामन राव ढगे ' गजानन वायझोडे ' काशीनाथ मानकर ' पत्रकार दयालसिंह '.. आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

